POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६१ ● मुंबई, शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबई-गोवा महामार्गावर जूनपासून टोल वसुली

### ओसरगाव टोल नाक्याची निविदा प्रसिद्ध, किती पैसे मोजावे लागणार?




■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

अनेक वर्षे रखडलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (एनएच-६६) चौपदरीकरणाला गती मिळत असतानाच आता टोल वसुलीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली-कसाल दरम्यान असलेल्या ओसरगाव टोल नाक्यावर लवकरच टोल वसुली सुरू होण्याची शक्यता असून, यासाठी १७ एप्रिल रोजी ऑनलाईन निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी मे २०२६ अखेरपर्यंत महामार्गाचे चौपदरीकरण पूर्ण होईल, अशी घोषणा केली होती. त्यानंतर अल्पावधीतच टोल वसुलीसाठी निविदा काढण्यात आल्याने जून २०२६ पासून टोल सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत. यापूर्वी १४ जून २०२३ रोजी ओसरगाव टोल नाक्यावर वसुली सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, सर्वपक्षीय आंदोलन आणि टोलविरोधी कृती समितीच्या तीव्र विरोधामुळे वसुली तात्काळ बंद करण्यात आली होती. त्यानंतर महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत टोल वसुलीचा विषय प्रलंबित ठेवण्यात आला होता.

आता पुन्हा टोल वसुलीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. निविदेनुसार या मार्गावर हलक्या वाहनांचे प्रमाण ४९ टक्के आहे. बस व ट्रक (२ ॲक्सल) २७ टक्के, तर मल्टी-ॲक्सल वाहनांचे प्रमाण १९ टक्के असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या मार्गावरून वषार्ला सुमारे ५७.८८ कोटी रुपयांचा टोल जमा होईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

**६० किमी पट्ट्यावर टोल वसुली**


नव्या निविदेनुसार, कणकवलीजवळील जानवली पूल ते पत्रादेवी (सिंधुदुर्गझ्गोवा सीमा) या सुमारे ६० किमी मार्गावर टोल आकारला जाणार आहे. दुचाकी व तीनचाकी वाहने वगळता इतर सर्व वाहनांना टोल भरावा लागणार असून, दरवर्षी सुमारे ५८ कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**जूनपासून सर्व टोल नाके सुरू होण्याची शक्यता**

स्थानिक वाहनांना टोलमधून पूर्ण सूट देण्याची मागणी यापूर्वी करण्यात आली होती. मात्र, नव्या निविदेत पूर्ण सूट देण्याचा कोणताही उल्लेख नाही. त्याऐवजी इतर वाहनांच्या तुलनेत काही प्रमाणात सवलत देण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ओसरगाव टोल नाक्यावरील वसुली सुरू झाल्यानंतर जून महिन्यापासून महामार्गावरील इतर टोल नाके टप्प्याटप्प्याने सुरू करण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती प्राधिकरणाच्या सूत्रांकडून देण्यात आली.

### टोल दरांची रूपरेषा (२०२६-२७)

| वाहन प्रकार | सिंगल ट्रिप (₹) | रिटर्न ट्रिप (₹) | मासिक पास (₹) | स्थानिक (₹) |
|---|---|---|---|---|
| कार/जीप/व्हॅन | ११५ | १७० | ३,७५५ | ५५ |
| मिनी बस/LCV/LGV | १८० | २७५ | ६,०६५ | ९० |
| बस/ट्रक (२ ॲक्सल) | ३८० | ५७० | १२,७१० | १९० |
| ३ ॲक्सल वाहन | ४१५ | ६२५ | १३,८६५ | २१० |
| ४ ते ६ ॲक्सल (MAV) | ६०० | ८९५ | १९,९३५ | ३०० |
| HCM / EME | ६०० | ८९५ | १९,९३५ | ३०० |
| ७ किंवा अधिक ॲक्सल | ७३० | १,०९० | २४,२६५ | ३६५ |



### टोल सुरू करण्यास ठाकरे शिवसेनेचा विरोध

**कणकवली :** मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम १२ वर्षांनंतरही अपूर्ण असताना टोल वसुली सुरू करण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याची टीका करत माजी आमदार वैभव नाईक यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. जोपर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल वसुली करू नये, अशी ठाकरे शिवसेनेची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कणकवली येथील विजयभवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सिंधुदुर्ग दौऱ्यात मे अखेरीस काम पूर्ण होईल, असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात काम अद्याप अपूर्ण असून पूर्ण होण्यासाठी आणखी कालावधी लागणार आहे, असे नाईक यांनी नमूद केले.टोल वसुली सुरू झाल्यास ठाकरे शिवसेना आंदोलन छेडेल, असा इशाराही नाईक यांनी दिला. टोलविरोधात जनतेने उठाव केला पाहिजे. सत्ताधारी टोल वसुलीसाठी पोलीस बळाचा वापर करू शकतात. त्यामुळे टोल निविदा प्रक्रियेलाच विरोध होणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

## लाडक्या बहिणींनो लक्ष द्या!

### ई-केवायसीसाठी शेवटची संधी, फक्त 'इतके' दिवस बाकी




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी केवायसी करताना अनेक लाडक्या बहिणींनी चुकीचे पर्याय निवडले होते, त्यामुळे त्यांना मिळणारा लाभ हा बंद झाला होता. त्यामुळे लाडक्या बहिणींना केवायसीसाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली होती. दरम्यान, या महिलांना केवायसीत दुरुस्ती करण्यासाठी फक्त शेवटचे आठ दिवस शिल्लक आहेत.

लाडकी बहीण योजनेच्या केवायसी करण्यासाठी 31 एप्रिल 2026 ही शेवटची तारीख आहे. याआधी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची शेवटची मुदत 31 मार्च 2026 पर्यंत दिली होती. त्यानंतर राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी पुन्हा या प्रक्रियेला मुदतवाढ देत याबाबत माहिती दिली होती.

लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीआधी सरकारकरने लाडकी बहीण योजना सुरु केली होती. ज्या माध्यमातून गरजू महिलांच्या थेट बँक खात्यावर प्रत्येक महिन्याला 1500 रुपये निधी जमा करण्यात येतो. या योजनेचा अनेक महिलांना लाभ होत आहे. तर ई-केवायसी च्या अडचणीमुळे अनेक गरजू महिलांना या योजनेचा लाभ मिळणे बंद झाले. त्यामुळे ई-केवायसीसाठी मुदतवाढ उपलब्ध करून देण्यात आली होती. ज्याचे फक्त शेवटचे आठ दिवस शिल्लक आहेत. लाडकी बहीण योजनेच्या केवायसी करण्यासाठी 31 एप्रिल 2026 ही शेवटची तारीख आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी अटी लाडकी बहीण योजना सुरु झाली तेव्हा अडीच कोटी महिलांनी अर्ज घेतला होता. यानंतर महिलांची पडताळणी करण्यात आली. यामध्ये अनेक महिलांनी निकषाबाहेर जाऊन लाभ घेतला होता. अनेक महिला २१ ते ६५ वयोगटात बसत नव्हत्या. अनेक महिलांचे उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त होते त्यांचा लाभ बंद केला आहे. सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनाही पैसे मिळणार नाहीत. एकाच कुटुंबातील फक्त दोन महिला लाभ घेऊ शकतात.

बोगस लाडक्या बहिणी आणि भाऊ लाडकी बहीण योजनेत अनेक टॅक्स भरणाऱ्या बड्या लोकांनी योजनेचा गैरफायदा घेतल्याचे समोर आले आहे. शिवाय काही पुरुषांनी तर कागदोपत्री महिला असल्याचं दाखवत योजनेचा गैरफायदा घेतला होता. राज्यात लाडक्या नसलेल्या या 12 हजार 757 पुरुषांनी सरकारला 22.96 कोटी रुपयांचा लाभ घेतला होता. श्रीमंत बहिणींकडून वसुलीसाठी ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदांना पत्र पाठवून 50 टक्के वसुली सुद्धा केली आहे.

फक्त आणि फक्त अडीच लाखांचे उत्पन्न असणाऱ्यांसाठीच असलेल्या या योजनेत भल्याभल्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील लाभ घेतल्याचं समोर आलं. या चुकीच्या प्रकारांवर अंकुश लावण्यासाठी ई-केवायसीची संकल्पना अंमलात आणली गेली, आणि बोगस लाभार्थ्यांना या योजनेतून गेट-आऊट करण्याची योजना आखली.

अशी करा केवायसी लाडक्या बहिणींनी योजनेच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन केवायसीमधील चुका दुरुस्त करायच्या आहेत. यासाठी वेबसाइटवर पर्याय देण्यात आला आहे. यावेळी योग्य पर्याय निवडून त्यावर जाऊन तुम्हाला आधार आणि ओटीपी व्हेरिफिकेशन करायचं आहे. यानंतर तुम्हाला योग्य माहिती भरायची आहे. त्यानंतरच तुम्हाला पैसे मिळायला सुरुवात होणार आहे. महिलांनी केवायसी केल्यानंतर त्याची पडताळणी केली जाईल त्यानंतरच पात्र महिलांचा लाभ पुन्हा सुरु केला जाईल.

### महाराष्ट्रात पूर्वमोसमी पाऊस... पण उकाड्याचं पारडं जड

**मुंबई :** महाराष्ट्रात हवामानाची दुहेरी स्थिती पाहायला मिळत असून, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पूर्वमोसमी पावसासाठी पूरक स्थिती निर्माण होत असली तरीही कोकणासह या भागांमध्ये उष्णतेचं पारडं जड असेल. पुढील 24 तासांमध्ये कोल्हापुरात गारपिटीचाही इशारा आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकावर चक्राकार वारे वाहणार असून, मध्य आणि वायव्य भारतात समुद्रसपाटीपासून पश्चिमी वाऱ्यांचा वेग असल्यानं मराठवाड्यावर पावसाळी ढग पाहायला मिळत आहेत. पुढचे चार दिवस कोकणातील जिल्ह्यांमध्ये उकाडा वाढणार असून, कमाल तापमानात वाढ होईल. मुंबईसह कोकणातील काही भागांध्ये गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानात वाढ होत असतानाच हे सत्र आता कायम राहील. गुरुवारी प्रामुख्यानं ठाणे, रायगड आणि रत्न ागिरीत उष्ण आणि दमट वातावरण राहील, तर दुपारी किंवा संध्याकाळी ढगाळ वातावरण आणि सोसाट्याच्या वाऱ्यांलह हलक्या सरींची शक्यताही हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दुपारी 12 ते 4 दरम्यानच्या वेळात मात्र या भागांमध्ये उकाडा असह्य होईल, ज्यामुळं विनाकारण नागरिकांनी घराबाहेर पडू नये असा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार पुढचे 48 तास राज्यात पश्चिमी झंझावाताचा प्रभाव पाहायला मिळेल. परिणामी दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्गात पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तर विदर्भात हवामान कोरडं राहील. येत्या काळात तापमानात 2- 3 अंशांनी वाढ होणार असून, मराठवाडा आणि विदर्भात पारा 41- 43 अंशांदरम्यान राहिल असा अंदाज आहे.

### महाराष्ट्र दिनापासून 'मुंबई अगेन्स्ट ड्रग्ज' मोहीम

## मुंबई उपनगरचे पालकमंत्री आक्रमक, नशामुक्त मुंबईसाठी जनजागृतीवर भर




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये आयोजित एका म्युझिक कॉन्सर्टदरम्यान अमली पदार्थांच्या (ड्रग्ज) अतिसेवनामुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने युवा पिढीला बसत असलेला अमली पदार्थांचा विळखा प्रकर्षाने जाणवला. या स्थितीत प्रतिबंधात्मक उपाय आणि युवा पिढीच्या जागरूकतेसाठी १ मे महाराष्ट्र दिनापासून नशामुक्त मुंबईसाठी 'मुंबई अगेन्स्ट ड्रग्ज' मोहीम राबवणार येणार आहे.

गोरेगाव येथील ड्रग्ज प्रकरणानंतर उपनगरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष बैठक बोलावली होती. या बैठकीला वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम उपस्थित होते.

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अतिशय बारकाईने गोरेगाव येथील प्रकरणात लक्ष घालत आहेत. मुंबई पोलीसही आपली भूमिका चोख बजावत असून आयोजक आणि काही अमली पदार्थ विक्रेत्यांना अटक करण्यात आली असून त्यांना कडक शासन होईलच, पण या घटना वारंवार घडू नयेत, यासाठी जनजागृती महत्त्वाची आल्यानेच ही बैठक बोलवली असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन १ मे २०२६ ते १ मे २०२७ या कालावधीत ह्यमुंबई अगेन्स्ट ड्रग्जह्ण ही मोहीम वर्षभर राबवणार असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

सध्या प्राथमिक तत्त्वावर उपनगरात ही मोहीम राबवली जाणार आहे. त्यानंतर ही मोहीम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात व्यापक स्वरूपात राबवली जाणार आहे. येत्या काही दिवसात वर्षभरातील कार्यक्रमांचा आराखडा निश्चित केला जाईल. तसेच यासंदर्भात एक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, गैरसरकारी संस्था अर्थात एनजीओच्या सहकार्याने ही कमिटी समाजात विविध उपक्रम राबवून तरुण पिढीला अमली पदार्थांपासून रोखण्याचे काम करणार आहे.

मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अमित साटम म्हणाले की, "तरुण पिढीला सावरण्यासाठी त्यांच्याच सोशल मीडियाद्वारे जनजागृती झाली पाहिजे. प्रत्येक समिती कक्षेतील शाळा, कॉलेजेस, मोठमोठे हॉटेल आणि मॉल या ठिकाणी जिथे तरुण असतील तिथे जागृती करणारे कार्यक्रम घेतले गेले पाहिजेत. तरुण पिढीला मनोरंजनापासून रोखणे हा पर्याय उचित ठरणार नाही, तर तरुण पिढीला विधायक आणि सुसंस्कृतपणे अमली पदार्थविरहित आनंद घेण्यासाठी समाजाने प्रवृत्त केले पाहिजे. तरुणांकडूनच जेव्हा अमली पदार्थाला ठामपणे नकार देण्यात येईल, तेव्हा आपण ही लढाई जिंकलो, असे म्हणता येईल."

**लोकचळवळ उभारण्याची गरज**

मुंबई पोलीस गेल्या १६ महिन्यांपासून ड्रग्जविरोधात कडक मोहीम राबवत आहेत. पोलिसांनी कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. ही समस्या केवळ पोलिसांच्या कारवाईने सुटणार नसून त्यासाठी लोकचळवळ उभारण्याची गरज असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले. प्रशासनाने कितीही अटकाव करण्याचा प्रयत्न केला तरी काही समाजविघातक प्रवृत्ती समाजात असतात या प्रवृत्तींच्या विरोधात आता सामाजिक संघटनांच्या माध्यमातून लढा उभारला जात आहे, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

**समितीत या सदस्यांचा समावेश**

नशामुक्ती क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या कमिटीचे अध्यक्ष नियुक्त करण्यात येतील. तसेच महापालिकेचे विद्यमान वॉर्ड अध्यक्ष या कमिटीचे उपाध्यक्ष असतील. सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी, मानसोपचार तज्ज्ञ, शिक्षण अधिकारी अशा १२ सदस्यांची कमिटी असेल. त्याचबरोबर स्थानिक संसद सदस्य, आमदार, नगरसेवक हे लोकप्रतिनिधी या कमिटीचे विशेष निमंत्रित सदस्य असणार आहेत.

## आणखी एका कांडाने महाराष्ट्र हादरला

### सावकाराच्या मोबाईलमध्ये 200 ते 300 अश्लील व्हिडिओ

■ **कोल्हापूर। प्रतिनिधी,**

नाशिकमध्ये सध्या भोंदू अशोक खरातचे काळे कारनामे आणि अश्लील कृत्य समोर आल्यानंतर अख्खं राज्य हादरलं. त्याचं हे प्रकरण गाजत असतानाच आता आणखी एका कांडाने महाराष्ट्राला हादरा बसला आहे. व्याजाने दिलेल्या पैशाच्या वसुलीसाठी महिलेवर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार कोल्हापुरात घडल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी संबंधित सावकार अमित सावंत याच्यावर कोल्हापूरच्या गांधीनगर पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे. मात्र त्याच्या मोबाईलमध्ये नको त्या गोष्टी असल्याचा दावा पीडित महिलेने केल्याने आणखीनच मोठी खळबळ माजली आहे. सावकार अमित सावंत याने फक्त या एकाच महिलेवर नव्हे तर अनेक असहाय्य महिलांवर अत्याचार केले असून, त्याचे घाणेरडे, अश्लील 200 ते 300 व्हिडिओ या सावकाराच्या मोबाईल मध्ये असल्याचा दावा पीडित महिलेने केला आहे.




तिच्या. दाव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या ताब्यात असलेला अमित सावंत हा पेशाने कारचालक असला तरी तो खाजगी सावकारी देखील करतो. यातूनच कोल्हापूर जवळील गडमुडशिंगी गावात राहणाऱ्या एका महिलेची त्याच्याशी ओळख झाली. संबंधित महिलेला पैशांची गरज असल्यामुळे दोन वर्षांपूर्वी तिने सावंत यांच्याकडून दहा टक्के दोन लाख रुपये व्याजाने घेतले. काही महिने व्याज सुरळीत दिल्यानंतर आर्थिक परिस्थिती मुळे संबंधित महिलेला सावंत याच्याकडे व्याज भरणं शक्य झालं नाही. मात्र याचा गैरफायदा घेत अमित सावंत हा संबंधित महिलेच्या घरी गेला आणि त्याने या महिलेवर जबरदस्तीने अत्याचार केले. एवढंच नव्हे तर या घटनेचा त्याने व्हिडिओ देखील शूट केला. आणि त्यानतंर त्याने याच याच व्हिडिओच्या आधारे पीडित महिलेला धमकावत तिच्यावर पुन्हा अत्याचर केले असा आरोप.

**मित्रांनाही दाखवले अश्लील व्हिडीओ**

त्याच नराधम सावकाराचा नीचपणा एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने हे अश्लील व्हिडिओ त्याने आपल्या मित्रांना देखील दाखवले. यामुळे संतप्त झालेल्या पीडित महिलेने जाबा विचारला. मात्र त्यानंतर अमित सावंत यांनी त्या महिलेसह तिच्या नातेवाईकांना जबर मारहाण केली. अखेर या पीडित महिलेने गांधीनगर पोलीस ठाण्यात धाव घेत, अमित सावंत याच्या गैरकृत्याचा पाढा वाचला. गांधीनगर पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत अमित सावंत याच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करत त्याला अटक देखील केली आहे.

### ठाणे स्टेशनवर 'शिवशाही' बसला भीषण आग

## १५ प्रवासी थोडक्यात बचावले

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे रेल्वे स्टेशन परिसरातील सेटीस ब्रिजवर आज म्हणजेच गुरुवार २३ एप्रिल रोजी 'शिवशाही' बसला अचानक भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. उन्हाच्या तडाख्यात आधीच त्रस्त असलेल्या प्रवाशांमध्ये या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्याहून पालघरमार्गे बोईसरकडे निघालेली ही बस स्टेशनजवळ येताच अचानक बंद पडली. त्यानंतर बसच्या खालच्या भागातून, विशेषतः इंजिन आणि डिझेल टाकीजवळून धूर निघू लागला आणि काही क्षणांतच बसने पेट घेतला. प्राथमिक अंदाजानुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे १५ प्रवासी होते. मात्र आग लागल्याचे लक्षात येताच सर्व प्रवाशांनी तत्काळ बसमधून बाहेर पडत धाव घेतली. त्यामुळे सुदैवाने मोठी



जीवितहानी टळली आणि सर्व प्रवासी सुखरूप बचावले.

आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी पाण्याच्या जोरदार फवाऱ्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. स्थानिक नागरिकांनीही मदतीसाठी धाव घेत अग्निशमन दलाला सहकार्य केले. मात्र आग प्रचंड भडकलेली असल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली. घटनास्थळी बसचा फक्त सांगाडा उरल्याचे दिसून आले. या घटनेमुळे काही काळ वाहतूक व प्रवाशांची हालचाल विस्कळीत झाली होती.

## लग्नासाठी अल्पवयीन मुलीचं अपहरण, हात-पाय बांधून जिल्हा परिषदेच्या शाळेत डांबलं अन्...

**नेमकं काय घडलं?**

नराधमाने गावातील अल्पवयीन मुलीचं अपहरण करून तिच्यावर अत्याचार केले. नंतर त्याने पीडितेचे हात-पाय आणि तोंड बांधून तिला जिल्हा परिषद शाळेच्या खोलीत डांबून ठेवलं. होतं. गोंदियाच्या दवनीवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत हा सगळा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे तिरोडा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दवनीवाडा पोलिसांनी आरोपी सुमित ऊईके (21) याच्याविरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

लग्नासाठी नकार दिल्याच्या रागातून अल्पवयीन मुलीचं अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. इतकंच नाही तर तिचं अपहरण केल्यानंतर हात-पाय बांधून डांबून ठेवलं होतं. गोंदियामध्ये घडलेल्या या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. दुसऱ्या दिवशी शाळेचा दरवाजा उघडल्यानंतर ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी याप्रकरणी आरोपीला अटक केली आहे. त्याच्याविरोधात दवनीवाडा पोलिसांनी पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे



**जबरदस्तीने दुचाकीवर बसविले आणि अपहरण केले**

तिरोडा तालुक्यातील अल्पवयीन पीडित मुलगी आणि आरोपी सुमित ऊईके हे एकाच गावातील रहिवासी असून गेल्या 2 वर्षांपासून त्यांच्यात ओळख होती. 3 महिन्यांपूर्वी आरोपीने पीडितेच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. मात्र, त्यानंतरही आरोपीचा छळ थांबला नाही. घटनेच्या दिवशी आरोपीने पीडितेला जीवे मारण्याची धमकी देऊन तिला जबरदस्तीने दुचाकीवर बसविले आणि तिचे अपहरण केले.

**'माझ्याशी लग्न कर, नाहीतर तुला जीवे मारीन'**

यानंतर त्याने तिला गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या एका खोलीत नेलं. 'माज्याशी लग्न कर, नाहीतर तुला जीवे मारीन' अशी धमकी देत लग्नासाठी दबाव टाकला. पीडितेने ठामपणे नकार दिला असता, आरोपीने क्रूरतेचा कळस गाठला. त्याने पीडितेचे तोंड, हात आणि पाय ओढणीने घट्ट बांधून तिला त्याच खोलीत बंद केलं आणि स्वतः तिथून पळ काढला.

दुसऱ्या दिवशी शाळा उघडण्यात आली तेव्हा हा प्रकार समोर आला. या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आरोपीला पोलिसांनी रात्री उशिरा अटक केल्याची माहिती तिरोड्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी साहिल झरकर यांनी बोलताना दिली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# हिंदुत्व सुपात, नव्हे जात्यात!



हिंदु मुलींचे शोषण झाल्याच्या धक्कादायक घटना सध्या प्रतिदिन मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. 'हिंदु मुलींच्या संदर्भात हे सर्व काय चालू आहे?', असा प्रश्न प्रत्येकालाच पडला आहे. अर्थात् ही सर्व परिस्थिती अचानक निर्माण झालेली नाही. त्याला मागील काही वर्षांची पार्श्वभूमी आहे. कथित स्वातंत्र्यासाठी आसुसलेल्या आणि त्यातूनच अत्याधुनिकतेच्या आहारी जाणाऱ्या मुलींच्या संदर्भात हे प्रकार अधिक प्रमाणात झाल्याचे आढळते. हे वास्तव आहे. आधुनिकतेला मयार्दा आहेत. त्या पार करून किंवा त्यांना धुडकावून कुणी वाटचाल करत असेल, तर ते संबंधिताच्या अंगाशी येणारच; कारण अत्याधुनिकता जोपासतांना नैतिक मूल्ये केव्हाच गळून पडतात, ते लक्षातही येत नाही. यामुळेच हिंदूंनी संस्कार, सतर्कता आणि सुरक्षितता यांचा विचार करायला हवा. गेल्या ८ दिवसांत घडलेल्या घटना थोडक्यात पाहू. मल्ल्याळम् चित्रपटसृष्टीतील अभिनेता शियास करीम याने त्याच्या हिंदु मैत्रिणीवर गोमांस खाण्यासाठी दबाव आणला. अमरावतीच्या घटनेत तर मुसलमान मुलाने १८० हिंदु मुलींचे अश्लील व्हिडिओ आणि छायाचित्रे काढली. १८० इतक्या मोठ्या संख्येत हिंदु मुली मुसलमानाच्या मागे जातातच कशा? नाशिकमधील प्रकार तर सर्वांत अधिक धक्कादायक ठरला. जे नाशिक कोणे एकेकाळी तीर्थक्षेत्रांसाठी प्रसिद्ध होते, त्या नाशिकला 'व्यावसायिक जिहाद'चे 'केंद्र' म्हणून कायमचेच गालबोट लागले. तेथे धर्मांतरासाठी हिंदु मुलींचाच वापर करण्यात आला. एका आस्थापनात 'हिजाब' घालणे चालत होते; पण टिकली, कुंकू, मेंदी यांच्यावर बंदी घालण्यात आली होती. असे असतांनाही तेथे अनेक हिंदु महिला नोकरी करत होत्या. येथे प्रश्न पडतो की, हे सर्व हिंदु मुली-महिलांच्याच संदर्भात का होते? अन्य धर्मीय मुलींचा अशा घटनांमध्ये अत्यल्प सहभाग असतो, मग हिंदूंचीच यात का शिकार होते? हिंदूंच्या मुली इतक्या स्वस्त झाल्या आहेत का की, त्या कधीही, कुणासाठीही आणि कुठेही उपलब्ध होऊ शकतील? कोण कुठला मुलगा येतो, गोड बोलून विश्वास जिंकतो, मैत्रीसह भावनिक गुंतवणूक वाढवतो आणि त्याचाच अपलाभ घेत तिच्यावर बलात्कार अन् तिचे लैंगिक शोषण करतो. वापर झाला की, पुन्हा दुर्सया हिंदु मुलीकडे मोर्चा वळवतो. मुलींचे आई-वडील हतबल होत अशा घटनांकडे पहात बसतात. काही आई-वडिलांना तर त्यांच्या मुली काय करत आहेत? कुणासमवेत छायाचित्रे काढत आहेत? याचा थांगपत्ताच नसतो. अतीस्वातंत्र्याच्या नादात 'आपण मुलीच्या आयुष्याची राखरांगोळी करत आहोत', याची त्यांना सुतरामही कल्पना नसते. ह्यमाझा अब्दुल असे करणार नाही', हे ज्याप्रमाणे हिंदु मुलींना वाटते, तशीच काहीशी भूमिका हिंदु पालकांचीही असते. 'माझी मुलगी 'त्यातली' नाहीच', असे ते छातीठोकपणे सांगतात आणि जेव्हा तिने मुसलमानसमवेत विवाह केला, हे वास्तव त्यांच्यासमोर येते, तेव्हा मात्र त्यांच्या पायाखालची भूमीच सरकते; पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. काही शहरांमध्ये हिंदु मुलींनी मुसलमानांसमवेत विवाह केल्याचे आणि ते पालकांपासून लपवून ठेवल्याचे प्रकार प्रत्यक्षात घडलेले आहेत. हिंदु मुलींना हे केवळ 'प्रेमप्रकरण' वाटते; पण प्रत्यक्षात जिहादी धर्मांधांनी हिंदु धर्म संपवण्यासाठी रचलेला हा सापळा आहे, हे लक्षात घ्या. एकदा सापळ्यात एखादी मुलगी शिरली की, ती तिचे 'स्वत्व' हरवून बसते. 'हिंदु मुलींना हे वास्तव लक्षात कसे येत नाही? हिंदु मुलींनी त्यांची बुद्धी गहाण ठेवली आहे का?' अशा स्वरूपाच्या संतप्त प्रतिक्रिया सामाजिक माध्यमांवर उमटत आहेत. हिंदु मुली स्वतःचा विवेक का गमावतात? वशीकरणाचे सूत्र जरी रास्त असले, तरी 'आपण हिंदु आहोत', ही ओळख पुसून टाकत असू, तर अशा मुलींना साहाय्य कोण करणार? नाशिकचे प्रकरण उघडकीस येऊन काही दिवस होत नाहीत, तोच एका मुसलमानाने एका प्रथितयश आस्थापनामधील नोकरीचे विज्ञापन प्रसारित केले होते. त्या आस्थापनात रात्रपाळी करावी लागणार होती आणि त्यासाठी महिलांना ने-आण करण्याची व्यवस्था करण्यात आल्याचा उल्लेखही विज्ञापनात दिला होता. या विज्ञापनावर अनेक हिंदु तरुणींनीच या नोकरीसाठी इच्छुक असल्याचे सांगत स्वतःची माहिती (बायोडेटा) मुसलमानाला पुरवली. आता यापुढे त्यांचे काय होईल, हे प्रत्येकाला चांगले ठाऊक आहे. या तरुणींमध्ये आपली मुलगी, बहीण, मैत्रीण, शेजारीण तर नाही ना? इस्लामी आक्रमकांनी त्या काळात हिंदु मिहलांच्या संदर्भात जी कुकृत्ये केली, त्यांचीच पुनरावृत्ती आज होत आहे. इस्लामी आक्रमकांच्या पाऊलखुणा पुसून टाकायच्या कि जपून ठेवायच्या, हे हिंदु समाजाने ठरवायला हवे. आतापर्यंतच्या घटना पाहिल्या, तर त्यात हिंदु महिलांनाच जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात आले आहे. ह्यहिंदुत्वह्ण संपवणे हा कुटील डाव त्यामागे आहे; पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हिंदूंना तो कुठे समजतो? सध्याच्या हिंदु मुलींना कुंकू, टिकली लावायला आवडत नाही; पण हिजाब घालायला आवडतो. हिंदु महिलाच आज मोठ्या प्रमाणात अश्लील गाण्यांवर नाचून 'रिल्स' बनवतात. मग अशा समाजाचे भवितव्य निश्चितच भयावह आहे. अशी वृत्ती जोपासर्णाया समाजात याहून वेगळे काय होणार? हिंदु समाज कधी पेटून उठणार? 'मला काय त्याचे?' ही मानसिकता तो कधी सोडणार? आज 'हिंदुत्व' जे मनामनांत रुजायला हवे, ज्या 'हिंदुत्वा'चे स्फुलिंग पेटायला हवे, तेच हिंदुत्व आज घराबाहेर टांगले जाते. त्या हिंदुत्वाच्या पुनजार्गृतीची कधी नव्हे एवढी मोठी आवश्यकता निर्माण झाली आहे. हिंदूंनो, तुम्ही पहलगाम आक्रमण विसरलात का? 'हिंदु' शब्द ऐकून अवघ्या दोन पावलांवरून डोक्यात गोळी घातली गेली होती. असे असतांनाही आणखी किती काळ निधर्मीवादाची झापडे लावून फिरणार आहात? सर्वधर्मसमभावाच्या शिकवणीला आणखी किती काळ जवळ घेऊन कुरवाळणार आहात? हिंदूंनी याचा अवश्य विचार करावा. एका घटनेत एका वडिलांना 'केरला स्टोरी २' हा चित्रपट त्यांच्या मुलीला दाखवायचा होता; पण आईने आडकाठी आणत सांगितले, "आता तिला हे असले काहीतरी दाखवू नका." 'सध्याच्या काळात आपल्या मुलांना काय दाखवायला हवे', याची जाण पालकांना नाही. त्यामुळे ते मुलांना काय दिशा देणार ? थोडक्यात काय, तर आपलेच नाणे खणखणीत नसते. शिक्षण, स्वातंत्र्य आणि नोकरी यांच्या गर्दीत धार्मिक परंपरांना हिंदूंनी झुगारून दिले आहे. त्यामुळे अन्य धर्मियांप्रमाणे हिंदूंमध्ये कट्टरता विशेष प्रमाणात दिसून येत नाही. ही सर्व परिस्थिती पहाता संकट दाराशी नव्हे, उंबरठ्यावरही नव्हे, तर घरात शिरले आहे. त्याचा सामना करण्यासाठी हिंदूंनी वेळीच धर्मनिष्ठ व्हावे, अन्यथा आज 'बहुसंख्य' असलेले तुम्ही उद्याच्या सूर्योदयानंतर 'अल्पसंख्य' व्हाल, इतकेही गाफील राहू नका. जिहादरूपी संकटाला हिंदूसंघटनाद्वारे परतवून लावा. त्यासाठी प्रथम संघटित होणे, ही काळाची आवश्यकता आहे.

# सिंहस्थाची तयारी की अराजकता?

जे काम वर्षानुवर्षे नियोजनपूर्वक, टप्प्याटप्प्याने आणि दजार्ला प्राधान्य देत व्हायला हवे होते, तेच जर शेवटच्या क्षणी गडबडीत उरकले जात असेल, तर त्यातून निर्माण होर्णाया परिणामांविषयी शंका निर्माण होणे साहजिक आहे. कामांचा वेग वाढला की अनेकदा गुणवत्तेचा श्वास गुदमरतो. अशा वेळी उरते ती फक्त वरवरची चकाकी, आतून पोकळ असलेली. अशा घाईघाईत उभ्या राहर्णाया प्रकल्पांना एक विशिष्ट स्वरूप असते. बाहेरून सगळे नीटनेटके, रंगरंगोटीने उजळलेले, पाहणाऱ्याला भुरळ पाडणारे, पण थोडा वेळ गेला की त्यातील उणिवा उघड होऊ लागतात. डांबरीकरणाचा ताजातवाना थर काही दिवसांतच उखडतो, सिमेंटचे काम पावसात टिकत नाही. ही भीती आज नाशिककरांच्या मनात घर करू लागली आहे.

बारा वर्षांचा कालावधी हा कोणत्याही प्रशासनासाठी नियोजन, अंमलबजावणी आणि पुनरावलोकनासाठी पुरेसा असतो. एवढ्या मोठ्या कालखंडानंतर होर्णाया सिंहस्थासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची उभारणी ही टप्प्याटप्प्याने, शास्त्रशुद्ध नियोजनाने आणि नागरिकांच्या सोयीचा विचार करून केली जाणे अपेक्षित होते. पण वास्तव मात्र पूर्णपणे उलट दिसते. ऐनवेळेला मंजूर झालेली कामे, घाईगडबडीत सुरू झालेली रस्त्यांची खोदाई आणि त्यातून निर्माण झालेला गोंधळ. हे सर्व पाहता नियोजनाचा पूर्णपणे अभाव स्पष्ट जाणवतो. आज नाशिकच्या रस्त्यांवरून फेरफटका मारणे म्हणजे जणू एखाद्या अडथळ्यांच्या शर्यतीत भाग घेण्यासारखे झाले आहे. सकाळी व्यवस्थित दिसणारा रस्ता सायंकाळपर्यंत खोदून ठेवलेला असतो. कोणताही पूर्वसूचना फलक नाही, पयार्यी मार्गांची माहिती नाही आणि वाहतूक नियंत्रणाचे ठोस नियोजन नाही. या सर्व गोष्टींमुळे सामान्य नागरिकांचा रोजचा प्रवास त्रासदायक बनला आहे.

पूर्वी जे अंतर दहा मिनिटांत पार केले जात होते, त्यासाठी आता वीस ते पंचवीस मिनिटांचा वेळ खर्च करावा लागतो. ही केवळ वेळेची नासाडी नाही, तर मानसिक तणावाचीही मोठी किंमत नागरिकांना मोजावी लागत आहे. कामावर जार्णाया व्यक्तींना उशीर होतो, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वेळापत्रक बिघडते आणि आपत्कालीन सेवांसाठी धावणाऱ्या वाहनांनाही या कोंडीत अडकून पडावे लागते. या सर्व परिस्थितीचा एकत्रित परिणाम म्हणजे शहरातील दैनंदिन जीवनाची लयच विस्कळीत झाली आहे. रस्त्यांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की वाहन चालवणे म्हणजे कौशल्याची कसोटी ठरते. खड्ड्यांनी भरलेले रस्ते, उंचसखल पृष्ठभाग आणि अर्धवट कामे यामुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. टायर, सस्पेन्शन, ब्रेक्स यांसारख्या महत्त्वाच्या भागांवर ताण येतो आणि वाहनधारकांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागतो. त्याहूनही गंभीर बाब म्हणजे या परिस्थितीमुळे मानवी आरोग्यावर होणारा परिणाम.

सततच्या धक्क्यांमुळे शरीराला त्रास होतो. पाठदुखी, सांधेदुखी यांसारख्या समस्या वाढतात. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे वाढलेले अपघातांचे प्रमाण. रस्त्यांवरील अनियमितता, अचानक येणारे खड्डे आणि वाहतुकीतील कोंडी या सर्व गोष्टी अपघातांना आमंत्रण देत आहेत. अनेकदा निष्पाप नागरिक यामध्ये जखमी होतात, तर काहींना आपला जीव गमवावा लागतो. अशा वेळी एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो, या अपघातांसाठी जबाबदार कोण? प्रशासनाचा निष्काळजीपणा, की परिस्थितीशी जुळवून घेण्यास भाग पडलेले नागरिक? नियोजनशून्यतेचा हा प्रकार व्यवस्थापनाच्या अपयशाचे प्रतीक आहे. जर गेल्या दोन वर्षांपासून टप्प्याटप्प्याने कामे सुरू केली असती, तर आज इतक्या मोठ्या प्रमाणावर रस्ते खोदण्याची गरज पडली नसती.



दर बारा वर्षांनी येणारा सिंहस्थ कुंभमेळा म्हणजे श्रद्धेचा महासागरच जणू. जिथे लाखो भाविक एकत्र येतात, आस्था व्यक्त करतात आणि परंपरेचा उत्सव साजरा करतात. मात्र, या भव्य सोहळ्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज नाशिक शहरात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, ती पाहता सुज्ञ नाशिककरांचे मन खट्टू होते. सिंहस्थाच्या अगदी तोंडावर कामांना लागलेली ही अचानक गती पाहिली की, ही धावपळ र्खया विकासासाठी आहे की केवळ देखाव्यासाठी, असा प्रश्न उभा राहतो.


खरे तर, सिंहस्थासारखा सोहळा हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेची, प्रामाणिकतेची आणि नियोजनक्षमतेची कसोटी असते. अशा वेळी भूतकाळातील अनुभव हे वर्तमानाला दिशा देणारे दीपस्तंभ ठरतात. गेल्या सिंहस्थाच्या आठवणी काढल्या तर एक नाव ठळकपणे पुढे येते ते म्हणजे डॉ. प्रवीण गेडाम. त्यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेली कामे आजही नाशिककरांच्या स्मरणात आदराने कोरलेली आहेत. त्या काळात शहरावर आलेल्या प्रचंड ताणाचा सामना करताना त्यांनी दाखवलेली कार्यशैली ही व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही आदर्श ठरावी अशी होती. त्यांच्या कामकाजात एक स्पष्ट तत्त्व जाणवत होते, कर्तव्याच्या आड कोणताही दबाव, कोणतीही तडजोड मान्य नाही. त्यामुळेच त्यांनी घेतलेले निर्णय अनेकदा कठोर वाटले, पण तेवढेच आवश्यक आणि परिणामकारक ठरले. कामांच्या गुणवत्तेबाबत ते अत्यंत जागरूक होते. कोणत्याही प्रकल्पात हलगर्जीपणा, ढिलाई किंवा फसवाफसवी सहन केली जाणार नाही, हा स्पष्ट संदेश त्यांनी सुरुवातीलाच दिला होता. एखाद्या कंत्राटदाराने निकृष्ट दजार्चे काम केले, वेळेत काम पूर्ण केले नाही किंवा नियमांचे उल्लंघन केले, तर त्याच्यावर तात्काळ कारवाई करण्यात त्यांनी अजिबात विलंब केला नाही. दंड आकारणे, कामे थांबवणे किंवा गरज पडल्यास कंत्राट रद्द करणे हे निर्णय त्यांनी निर्भयपणे घेतले. त्यांची कठोरता केवळ कंत्राटदारांपुरती मर्यादित नव्हती. प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठीही त्यांनी तितकीच जबाबदारी निश्चित केली होती. कामात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही त्यांनी सोडले नाही. वेळप्रसंगी त्यांच्याकडूनही दंड आकारण्यात आला, तर काहींना शिस्तभंगाची कारवाईही सहन करावी लागली. या सगळ्यामुळे प्रशासनात एक प्रकारची सजगता निर्माण झाली होती. प्रत्येकजण आपल्या कामाबाबत अधिक जागरूक झाला होता. 'चुकला त्याला ठोकला', ही त्यांची कार्यपद्धती प्रत्यक्षात दिसत होती. या तत्त्वामुळे कुणालाही निष्काळजीपणाला वाव उरला नाही. काम करताना प्रत्येकजण आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून काम करू लागला. परिणामी, कामांचा दर्जा प्रत्यक्षातही उच्च दजार्चा राहिला. त्या वेळी तयार केलेले रस्ते आणि पायाभूत सुविधा केवळ कुंभमेळ्यापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर पुढील अनेक वर्षे शहराच्या विकासाला आधार देत राहिल्या. आजही त्या रस्त्यांवरून जाताना नागरिकांना त्या काळातील सुबक नियोजनाची आणि टिकाऊ कामांची साक्ष पटते.

यंदाच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा त्यांच्याच खांद्यावर प्रशासकीय नेतृत्वाची जबाबदारी आली आहे. हा एकप्रकारे नाशिककरांसाठी आशेचा किरण आहे. परंतु ही आशा जितकी सकारात्मक आहे, तितकीच ती अपेक्षांच्या ओज्यानेही भारलेली आहे. एकदा उत्कृष्टतेचा मापदंड निर्माण झाला की, त्याहून कमी काहीही स्वीकारार्ह राहत नाही. गेल्या वेळी ज्या दर्जेदार कामांनी नागरिकांचा विश्वास जिंकला, त्याच दजार्ची पुनरावृत्ती यंदाही व्हावी, ही सर्वांची अपेक्षा आहे. सध्याची परिस्थिती मात्र या अपेक्षांना छेद देणारी वाटते. शहरात सुरू असलेल्या कामांचा वेग जरी प्रचंड असला, तरी त्यात नियोजनाचा अभाव आणि समन्वयाची कमतरता स्पष्टपणे जाणवते. रस्त्यांची उकरापाचक, अर्धवट कामे आणि त्यातून निर्माण झालेली अव्यवस्था या सगळ्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हा गोंधळ एकवेळ सहन केला जाऊ शकतो, कारण मोठ्या कामांसाठी काही प्रमाणात त्रास हा अपरिहार्य असतो. पण या त्रासाच्या बदल्यात मिळणारा परिणाम जर दर्जेदार नसेल, तर मात्र नागरिकांचा संताप अनावर होऊ शकतो. शेवटी विकासकामांचा हेतू हा नागरिकांचे जीवन सुलभ करणे हा असतो, त्यांना अधिक त्रास देणे नव्हे. आज शहराचा जो बोजवारा उडालेला दिसतो, तो तात्पुरता आहे, अशी आशा लोक बाळगून आहेत. पण ही आशा तेव्हाच टिकेल, जेव्हा अंतिम परिणाम त्यांच्या अपेक्षांवर खरा उतरेल.

या पार्श्वभूमीवर आणखी एक गंभीर बाब समोर येते ती म्हणजे सिंहस्थाशी संबंधित निविदांविषयी निर्माण झालेले संशयाचे वातावरण. मध्यंतरी व्हायरल झालेल्या एका ऑडिओ क्लिपने या संशयाला अधिक खतपाणी घातले आहे. या क्लिपमधून उघड झालेल्या 'वाटप' आणि 'टक्केवारी'च्या चर्चांनी सामान्य नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. जरी या प्रकरणावर फारसा गदारोळ झाला नसला, तरी लोकांच्या मनात शंकेची बीजे मात्र नक्कीच रोवली गेली आहेत. म्हणूनच आज जर प्रत्यक्षात कामांच्या गुणवत्तेत कसूर दिसून आला, तर या संशयांना अधिक बळ मिळेल आणि त्यातून निर्माण होणारा रोष प्रशासनासाठी धोकादायक ठरू शकतो. या संपूर्ण परिस्थितीत प्रशासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे विश्वास पुनर्स्थापित करण्याचे. दजेर्दार, टिकाऊ आणि पारदर्शक कामे हीच त्या विश्वासाची खरी पायाभरणी ठरतात. डॉ. गेमाड यांच्यासारख्या अनुभवी अधिर्कायांकडून याच गोष्टीची अपेक्षा आहे. यासाठी 'डोळ्यात तेल घालून' काम करणे आवश्यक आहे. प्रत्येक तपशीलाकडे बारकाईने लक्ष देणे, प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासणे आणि कोणत्याही प्रकारच्या तडजोडीला थारा न देणे. अन्यथा, जर कामांमध्ये हलगर्जीपणा, भ्रष्टाचार किंवा दर्जाहीनता आढळली, तर परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते.

याचबरोबर सिंहस्थाचा आत्माच बदलण्याचा आणखी एक सूक्ष्म पण गंभीर बदल घडताना दिसतो. हा सोहळा परंपरेचा, श्रद्धेचा आणि अध्यात्माचा आहे. पण जेव्हा सोहळ्याच्या तयारीचा केंद्रबिंदू 'दिसणे' हा होतो, तेव्हा 'असणे' मागे पडते. धार्मिक सोहळ्याची जागा हळूहळू एका 'इव्हेंट'ने घेतली जाते, जिथे व्यवस्थापनापेक्षा सादरीकरणाला, श्रद्धेपेक्षा सजावटीला आणि परंपरेपेक्षा प्रचाराला अधिक महत्त्व दिले जाते. हीच गोष्ट जुन्या जाणत्या नाशिककरांना अस्वस्थ करते. त्यांनी पाहिलेला सिंहस्थ हा साधेपणातही भव्य होता आणि भव्यतेतही आत्मिक होता. पण आज जे चित्र समोर उभे राहते आहे, त्यात ही आत्मिकता हरवण्याची भीती त्यांना सतावत आहे. जेव्हा शहराचा चेहरा रंगरंगोटीने झळाळतो, पण त्यामागे असलेली मातीची ओळख पुसली जाते, तेव्हा 'नाशिकपण'च धोक्यात येते. म्हणूनच आज गरज आहे ती या गोंधळातही मूळ मूल्यांना जपण्याची. कामे व्हायलाच हवीत, विकासही आवश्यक आहे; पण तो विकास केवळ दिसण्यासाठी नसून टिकण्यासाठी आणि जपण्यासाठी असला पाहिजे. अन्यथा, रंगरंगोटीच्या थराखाली लपलेली ही पोकळी एक दिवस उघडी पडेल आणि तेव्हा केवळ रस्तेच नाही, तर विश्वासही खचलेला असेल.

# भारत होतोय उपचार पद्धतींमधील महाशक्ती



येत्या दशकात भारत केवळ 'जेनेरिक' औषधांमध्येच नव्हे, तर नावीन्यपूर्ण औषधे, फर्मेंटेशन आधारित उत्पादने आणि पुढील पिढीच्या उपचार पद्धतींमध्येही एक मोठी शक्ती म्हणून उदयास येण्याच्या स्थितीत भारत आहे.

जागतिक औषधनिर्माण परिदृश्यात जैविक औषधे, बायोसिमिलर्स आणि विशेष औषधांचा वाटा आता औषधनिर्माण महसुलाच्या ४० टक्क्यांहून अधिक आहे. जेनेरिक औषध उत्पादनामधील नेतृत्त्वामुळे दीर्घकाळापासून 'जगाचे औषधालय' म्हणून ओळखला जाणारा भारताचा औषधनिर्माण उद्योग आता व्याप्तीकडून नवोन्मेषाकडे वेगाने वाटचाल करत आहे.

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मांडलेल्या १० हजार कोटी रुपये खर्चाच्या बायोफार्मा शक्ती या उपक्रमाची घोषणा म्हणजे या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यातूनच येत्या ८ ते १० वर्षांत जैवऔषधनिर्मिती मधील नवोन्मेष आणि जास्त परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांचे एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून उदयाला येण्याचा भारताचा निर्धार स्पष्ट होतो. ही दूरदृष्टी सखोल वैज्ञानिक क्षमता निर्मिती, नवोन्मेष आधारित उद्योगांना चालना आणि पुढील पिढीतील वैद्यकशास्त्रात भारताला एक अग्रणी म्हणून आपले स्थान मजबूत करण्यासाठी आवश्यक दृष्टिकोन प्रदान करेल.

जैविक औषधे आणि बायोसिमिलर्स तसेच प्रगत परिणामकारक आणि किफायतशीर औषधोपचारांना अधिकाधिक चालना देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. हे औषधनिर्माण विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि जैवतंत्रज्ञान विभागाच्या विद्यमान उपक्रमांना पूरक असून त्यामध्ये जैवऔषधांसह जीवन विज्ञान क्षेत्रातील संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या 'फार्मा मेडटेक क्षेत्रातील संशोधन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन', 'संशोधन विकास आणि नवोपक्रम योजना', 'बायोनेस्ट' इत्यादींसारख्या योजनांचा समावेश आहे. एकंदरीत हे सर्व उपक्रम भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेला बळकट करणे, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्य दृढ करणे आणि जेनेरिक औषधांपासून ते नवोन्मेष आधारित औषध शोध आणि विकासाकडे संक्रमण सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

या धोरणातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे फर्मेंटेशन-आधारित उत्पादन क्षमतांचा विकास करणे हा आहे. अँटीबायोटिक्स, लसी, एन्झाइम्स आणि इतर जैव-औषधे तयार करण्यात हा विभाग खूप महत्त्वाचा असूनही, तो खूप काळापासून आयातीवर अवलंबून आहे. पायाभूत सेवा सुविधांमध्ये गुंतवणूक करुन तंत्रज्ञानाचा विकास आणि हस्तांतरण साध्य करुन आणि उद्देश केंद्रीत प्रोत्साहन प्रदान करुन भारत या महत्त्वपूर्ण क्षेत्रात देशांतर्गत क्षमता विकसित करण्याबरोबरच जागतिक स्पर्धात्मकतेत वृद्धी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

भारताच्या वैद्यकीय संशोधन परिसंस्थेचा विस्तारही तितकाच महत्त्वाचा आहे. उभारण्यात येणाऱ्या एक हजार मान्यताप्राप्त क्लिनिकल ट्रायल साइट्समुळे जागतिक औषध विकास केंद्र म्हणून भारताची प्रतिमा लक्षणीयरीत्या उंचावेल. किफायतशीर दर आणि कुशल संशोधकांच्या वाढत्या प्रमाणामुळे भारत अत्यंत प्रभावी आणि उच्च दर्जाच्या क्लिनिकल ट्रायलसाठी अगणित संधी प्रदान करणार आहे. त्यासोबतच नियामक चौकटीचे बळकटीकरण आणि संस्थात्मक क्षमतांमधील वृद्धीमुळे भारताला जागतिक मापदंडांशी सुसंगत कामगिरी करणे शक्य होईल, जलदगती मान्यता आणि जागतिक हितधारकांमध्ये विश्वास वाढीला लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन आणि बल्क ड्रग पार्क अशा योजनांच्या मदतीने सक्रिय औषधनिर्माण घटक आणि प्रमुख कच्चा माल यांचे देशांतर्गत उत्पादन जलद गतीने वाढवले आहे. यामुळे देशातील औषधांच्या किंमती कमी झाल्या असून त्या जगातील सर्वात कमी आहेत, त्यामुळेच नागरिकांना आरोग्यसेवा अधिक किफायतशीर दरात प्राप्त होणे शक्य झाले. प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजनेमुळे स्वस्त दरात चांगल्या दर्जाच्या जेनरिक औषधांची उपलब्धता वाढली आहे. १९ हजार पेक्षा जास्त जनऔषधी केंद्रांमधून लाखो लोकांना सेवा दिली जाते. कर्करोग आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांसारख्या महत्त्वपूर्ण उपचारांवरील सीमा शुल्काचे सुसूत्रीकरण यांसारख्या पूरक उपायांमुळे, जीवनरक्षक उपचारांची उपलब्धता आणखी सुधारत आहे. प्रगत उपचारपद्धती जसजशा अधिक व्यापक होत जातील, तसतसे त्या परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतील आणि सर्वांना समान संधी मिळेल हे सुनिश्चित करणे, हे एक प्रमुख धोरणात्मक प्राधान्य राहील.

जसजसे उद्योगक्षेत्र बदलत आहे, भारत सुस्थापित बाजारपेठेतच नव्हे तर विशेषतः नवोन्मेष आधारित क्षेत्रांमध्येही आपले अस्तित्त्व अधिक ठळकपणे विस्तारण्याच्या प्रयत्नात आहे. सर्व धोरणे या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहेत. नियामक सुसूत्रीकरण, मंजुरी प्रक्रियेचे डिजिटलायझेशन आणि जलद मंजुरी या प्रयत्नांमुळे व्यवसाय सुलभता सुधारत आहे. गुणवत्ता मानके आणि नियामक प्रक्रिया अधिक मजबूत करणे या दोन गोष्टींमुळे भारताच्या औषधनिर्माण उत्पादनांमधील जागतिक विश्वास वाढीला लागत आहे. मात्र संशोधन आणि विकासाकरता लागणारी सातत्यपूर्ण गुंतवणूक हे एक प्रमुख आव्हान ठरत आहे. यावर मात करुन दीर्घकालीन संशोधन कायम पुढे नेण्यासाठी सार्वजनिक-खाजगी क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करणे गरजेचे आहे.

भविष्यात डोकावताना, धोरणात्मक पाठिंबा, तांत्रिक प्रगती आणि बाजारपेठेतील संधी यांनी औषधनिर्माण क्षेत्रासाठी वृद्धीची वैशिष्ट्यपूर्ण कवाडे खुली केली आहेत. भारताची देशांतर्गत बाजारपेठ आधीच चार लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याची असून, ती पुढेही सातत्याने वाढणार आहे. येत्या दशकात भारत केवळ 'जेनेरिक' औषधांमध्येच नव्हे, तर नावीन्यपूर्ण औषधे, फर्मेंटेशन आधारित उत्पादने आणि पुढील पिढीच्या उपचार पद्धतींमध्येही एक मोठी शक्ती म्हणून उदयास येण्यासाठी सुस्थितीत आहे.

सारांश, भारताचे औषधनिर्माण क्षेत्र, नवोन्मेष, लवचिकता आणि जागतिक स्पर्धात्मकतेच्या एका नवीन वैशिष्ट्यपूर्ण टप्प्यात प्रवेश करत आहे. बायोफार्मा शक्ती कार्यक्रम, सतत विस्तारणारी वैद्यकीय पायाभूत सेवासुविधा आणि उद्दिष्ट केंद्रीत उत्पादन प्रोत्साहन यांसारख्या उपक्रमांच्या पाठबळावर, भारत सातत्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या जेनेरिक औषधांच्या केंद्राकडून उच्च मूल्याच्या जैवऔषध नवोन्मेषातील अग्रणी देशाकडे स्थिरपणे स्थित्यंतर करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकसित भारत २०४७ अंतर्गत जागतिक आरोग्यसेवा आणि व्यापक उद्दिष्टांमध्ये भारताची भूमिका मजबूत करण्यासाठी हे परिवर्तन केंद्रस्थानी असेल.

# सौर ऊर्जेने उजळतोय दक्षिण महाराष्ट्र



जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जग आता शाश्वत ऊर्जेकडे वळत आहे. भारतानेही अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रगण्य भूमिका बजावत आहे. महाराष्ट्रात स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने मोठी झेप घेतली जात असून सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात मोठी ऊर्जा क्रांती घडत आहे. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प, सौर कृषी वाहिनी योजना, तसेच महावितरणच्या विविध उपक्रमांमुळे सांगली, सातारा आणि कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय प्रगती दिसून येत आहे. राज्यात सौर ऊर्जेची एकूण क्षमता ८,४५० मेगावॅटपर्यंत पोहोचली असून सातारा हा जिल्हा या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसत. यामुळे केवळ ऊर्जा उत्पादन वाढले नाही, तर पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्वही कमी झाले आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महावितरण या राज्याच्या प्रमुख वितरण कंपनीची महत्त्वाची भूमिका आहे. ही कंपनी राज्यातील हजारो गावांपर्यंत वीज पुरवठा करते. सौर प्रकल्पांना जोडून ऊर्जा वितरण अधिक सक्षम बनवत आहे. सातारा जिल्हा सौरग्राम संकल्पनेत विशेष अग्रेसर आहे. साताऱ्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले "सौरग्राम" ठरले आहे. येथे संपूर्ण गावाची विजेची गरज सौर ऊर्जेद्वारे पूर्ण केली जाते. या संकल्पनेमुळे ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठा शक्य झाला असून शाळा, अंगणवाडी, शेती सिंचन आणि घरगुती वापरासाठी हक्काची वीज उपलब्ध झाली आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही सौर कृषी वाहिनी योजना आणि रूफटॉप सोलर प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) मार्फत शेतकऱ्यांना सौर पंप आणि सिंचनासाठी सौर प्रणाली उपलब्ध करून दिली जात आहे. सौर पंपांमुळे शेतकऱ्यांचा वीज खर्च शून्यावर आला असून, विजेसाठी पावसावर किंवा रात्रीच्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही. सौर ऊजेर्चा सर्वात मोठा फायदा म्हणजे कार्बन उत्सर्जनात होणारी घट आणि पर्यावरण संरक्षण. ग्रामीण भागातील वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होऊन सातत्यपूर्ण पुरवठा मिळत आहे. तसेच, 'प्रधानमंत्री सूर्यघर योजना' आणि राज्य शासनाच्या अनुदानामुळे घरांवर सौर पॅनल बसवणे सर्वसामान्यांना परवडणारे झाले आहे. ३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर प्रणालीवर ४०% पर्यंत अनुदान मिळत असल्याने मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा मोठा आर्थिक लाभ होत आहे. दक्षिण महाराष्ट्रातील या जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे. सोलर पॅनल बसवणे, देखभाल आणि तांत्रिक सेवा या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. उद्योग आणि शेती क्षेत्राला स्वस्त वीज उपलब्ध झाल्याने त्यांची उत्पादनक्षमता वाढली आहे. एकूणच, मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प आणि संबंधित योजनांमुळे दक्षिण महाराष्ट्रात सकारात्मक परिवर्तन होत आहे. येत्या काळात या प्रकल्पांचा विस्तार अधिक वेगाने झाल्यास "ऊर्जेत आत्मनिर्भर दक्षिण महाराष्ट्र" ही संकल्पना लवकरच वास्तवात येईल.

# आंबा खाल्यानंतर साल फेकून देताय ? थांबा !



आंबा खायला कोणाला आवडत नाही? उन्हाळा सुरू होण्याची प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहत आहे. सध्या आंब्याचा मोसम नसला तरी बाजारपेठ आणि दुकानांमध्ये आंबे पाहायला मिळत आहेत. आंबा खाताना लोक सहसा त्याची साल कचरा म्हणून फेकून देतात.पण तुम्हाला माहित आहे का, आंब्याची साल तुमच्या आरोग्यासाठीही फायदेशीर ठरू शकतात. मात्र तुम्ही देखील आंबा खाल्ल्यानंतर त्याची साल फेकून देत असाल तर ही चूक कधीही करू नका. आज आम्ही आंब्याच्या सालीच्या अशाच काही मोठ्या फायद्यांबद्दल सांगणार आहोत.

## कर्करोग दूर करतो

एका अहवालानुसार, आंब्याच्या सालीमध्ये अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, जे आपल्याला कर्करोगापासून वाचवतात, आंब्याची साल फुफ्फुसाचा कर्करोग, आतड्याचा कर्करोग, मेंदूचा कर्करोग आणि स्तनाचा कर्करोग यापासून बचाव करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. तसेच, आंब्याच्या सालीमध्ये भरपूर प्रमाणात फायटोन्यूट्रिएंट्स आढळतात.

## वजन कमी करण्यासाठी फायदेशीर

याशिवाय वजन कमी करायचे असेल तरी देखील आंब्याची साले खाऊ शकता. असे मानले जाते की त्याची साल वजन कमी करण्यासाठी देखील खूप उपयुक्त आहे. म्हणजेच वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या लोकांनी आंब्याची साल अजिबात फेकू नये. कारण त्यामुळे तुमचे वाढलेले वजन कमी होऊ शकते.

## पिंपल्सपासून सुटका मिळते



चेहऱ्यावर पिंपल्स आल्यावर आंब्याच्या सालींचा उपाय खूप उपयोगी पडतो असे झाल्यावर आंब्याची साल बारीक करून त्याची पेस्ट तयार करा आणि मग पिंपल्सवर लावायला सुरुवात करा. काही दिवसात पिंपल्स आपोआप जायला सुरुवात होईल आणि कोणत्याही प्रकारचे डागही चेहऱ्यावर राहणार नाहीत.

# फ्रूट ज्यूस जास्त प्यायल्याने अकाली मृत्यूची शक्यता

जर तुम्ही विचार करत असाल की, फ्रुट ज्यूस हेल्दी असतो आणि त्याच्या सेवनाने तुमचं आरोग्य उत्तम राखण्यासाठीही मदत होते. पण हा तुमचा गैरसमज आहे. कोल्डड्रिंक्स, इतर सोडा असणारे ड्रिंक्स किंवा लेमेनेड तुमच्या आरोग्याला जेवढं नुकसान पोहोचवतात. त्यापेक्षा कित्येकपट्टींनी जास्त फ्रुट ज्यूस आरोग्यासाठी घातक ठरतात. ऐकून धक्का बसला असेल ना? हे आम्ही सांगत नसून एका रिसर्चमधून सिद्ध झालं आहे. रिसर्चनुसार, फ्रुट ज्यूसच्या सेवनाने वेळेआधी मृत्यू होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो.

### १०० टक्के फ्रूट ज्यूसची तुलना कोला आणि लेमेनेडसोबत करण्यात येते

काही दिवसांमध्ये करण्यात आलेल्या एका रिसर्चमधून असा खुलासा करण्यात आला आहे की, अनेक लोक मोठ्या प्रमाणावर शुगर ड्रिंक्स आणि फ्रुट ज्यूसचं सेवन करतात. त्यांच्यामध्ये वेळेआधी मृत्यू होण्याचा धोका अधिक वाढतो. अमेरिकेतील संशोधकांनी पहिल्यांदा १०० टक्के फ्रुट ज्यूसची तुलना कोला आणि लेमेनेड यांसारख्या गोड पदार्थांसोबत केली होती. संशोधनातून सिद्ध झाल्यानुसार, शुगर ड्रिंक्स आणि फ्रुट ज्यूस दोघांमध्येही फार समानता आहे. त्यामुळे या दोन्हींच्या अतिसेवनाने अकाली मृत्यूचा धोका वाढतो. तसेच त्यांनी असं देखील सांगितलं की, याबाबत आणखी रिसर्च करण्याची गरज आहे.

### जास्त फ्रुट ज्यूस प्यायल्याने वेळेआधी मृत्यूचा धोका २४ टक्क्यांनी वाढतो

एक्सपर्ट्सनुसार, प्रत्येक दिवशी १५० एमएल ग्लास फ्रुट ज्यूसचं सेवन केल्यामुळे कोणत्याही प्रकारचा धोका राहत नाही. परंतु याच्या अतिसेवनाने मृत्यूचा धोका २४ टक्क्यांनी वाढतो. सोडा असणाऱ्या शुगर ड्रिंक्सचं जास्त सेवन केल्याने वेळेआधी मृत्यू होण्याचा धोका ११ टक्क्यांनी वाढतो. याचा अर्थ असा की, मोठ्या प्रमाणावर केलेलं फ्रुट ज्यूसचं सेवन किंवा सोडा असणाऱ्या ड्रिंक्स जास्त हानिकारक ठरतात.

### सोडा, शुगरी ड्रिंक्स आणि फ्रूट ज्यूसच्या सेवनाने तपासणी

जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशन मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या नव्या रिसर्चनुसार, १३ हजार ४४० लोकांचा डाटा तपासण्यात आला. त्यानंतर प्रश्न-उत्तरांमार्फत या लोकांच्या सोडा आणि शुगर ड्रिंक्सच्या इनटेकसोबत १०० टक्के फ्रुट ज्यूसच्या सेवनाचे आकडेही रेकॉर्ड करण्यात आले. यातून हे समजुन घेण्याचा प्रयत्न करण्यात आला की, केव्हा आणि कितपत ड्रिंक्सचं सेवन करतात.

### फ्रूट ज्यूस आणि शुगरी ड्रिंक्सच्या न्यूट्रिएंट कंटेटही एकसमान

६ वर्षांच्या एका फॉलोअप दरम्यान असं समजलं की, एका सरासरीनुसार, जवळपास १ हजार लोकांना सर्व्हेमध्ये सहभागी करण्यात आले होते. त्यातील १६८ लोकांचा मृत्यू कोरोनरी हार्ट डिजीज म्हणजेच हृदयासंबंधी आजारांमुळे झाला. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, रिसर्चमधील निष्कर्ष सांगतात की, जास्त साखर असणारे पेय पदार्थ ज्यांमध्ये सोडा, लेमेनेड आणि फ्रूट ज्यूस यांसारख्या ड्रिंक्सचा समावेश असण्याचा संबंध वाढलेल्या मृत्यू दराशी आहे. तसेच १०० टक्के फ्रूट ज्यूस आणि शुगर स्वीटेंड बेवरेजचं न्यूट्रिएंट कंटेटही एकसमानच आहे.

# मल्टीपल स्क्लेरोसिस आजाराबद्दल 'या' गोष्टी जाणून घ्या



मल्टिपल स्क्लेरॉसिस हा असा विकार आहे ज्यामुळे व्यक्तीच्या मेंदूवर आणि पाठीच्या कण्यावर परिणाम होतो. एखादी व्यक्ती जनुकीय दृष्ट्या नाजूक असल्यास आणि जीवनसत्वांचे प्रमाण कमी असल्यास, विषाणू आणि पर्यावरणीय घटकांमुळे हा विकार जडू शकतो. या विकारामुळे मज्जातंतूंभोवती असलेल्या संरक्षक कवचावर परिणाम होतो. परिणामी मज्जासंस्था शरीराला संदेश पाठविण्याचे कार्य करू शकत नाही. डॉ. महाजन हॉस्पिटलचे रिजनरेटिव्ह मेडिकल एक्स्पर्ट डॉ. प्रदीप महाजन यांनी यासंदर्भात माहिती दिली. थकवा येणे, दृष्टी दोष, मुंग्या यणे अथवा बधीर होणे, उंच ठिकाणाची भिती वाटणे, चक्कर येणे, स्नायू अशक्त होणे आणि गोळे येणे, तोल आणि समन्वयाशी निगडीत समस्या ही मल्टिपल स्क्लेरॉसिसची लक्षणे आहेत. अस्पष्ट उच्चार, गिळताना येणाया समस्या, आकलनक्षमतेवर परिणाम, चालताना त्रास होणे, मलमूत्रविसर्जनाच्या समस्या, स्वभावातील चढउतार किंवा नैराश्य ही लक्षणेसुद्धा आढळतात. मल्टिपल स्क्लेरॉसिस झालेल्या रुग्णावर बहुधा इम्युन-सप्रेसिव्ह औषधे आणि मोनोक्लोनल अँटिबॉडीजनी उपचार करण्यात येतात. पण ही औषधे जास्त कालावधीसाठी वापरली असता साईड इफेक्ट्स होऊ शकतात आणि यामुळे लक्षणांवर पूर्ण उपचार होत नाहीत. सेल्युलर थेरपीचा वापर करून, स्टेम सेलच्या विविध गुणधर्माचा वापर करून मल्टिपल स्क्लेरॉसिसवर पूर्ण उपचार करता येऊ शकतात. ऑटोलॉगस पेशीवर आधारित थेरपीमध्ये रुग्णाच्या स्वतःच्या शरीरातील स्टेम सेल्सचे प्रत्यारोपण करण्यात येते, ज्याने प्रतिकारक क्षमता पुनर्स्थापित होते. ऑटोलॉगस स्टेम सेल या न्यूरोप्रोटेक्टिव्ह असतात आणि त्यात पॅराक्राईन गुणधर्मसुद्धा असतात, ज्यामुळे मल्टिपल स्क्लेरॉसिस असलेल्या रुग्णांना लाभ होऊ शकतो. त्याचप्रमाणे स्टेमसेलमध्ये असलेल्या प्रतिकारक्षमता व्यवस्थापनाच्या गुणधर्मामुळे मल्टिपल स्क्लेरॉसिस झालेल्या रुग्णांच्या केंद्रीय चेतासंस्थेला झालेले नुकसान कमी होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे अपाय झालेल्या मज्जातंतूची पुनर्निर्मिती करण्यास मदत करतात. रुग्णांना बरे होण्यास लागणारा कालावधी २ महिन्यांपासून ते १ वर्षापर्यंतचा असू शकतो. स्टेमसेल शरीरात कार्यरत करण्यासाठी विविध मार्ग आहेत, रुग्णाची परिस्थिती आणि आवश्यकता यावर हा मार्ग अवलंबून असतो. चेतासंस्थेच्या विकारामध्ये ज्या मार्गाने पेशी मेंदूपर्यंत पोहोचविता येऊ शकतात, तो मार्ग योग्य मार्ग असतो. मल्टीपल स्क्लेरॉसिस सारख्या विकाराला रोखता येत नाही परंतु वेळीच निदान त्याची तीव्रता नक्कीच कमी करू शकते. प्रतिबंधक उपायांमध्ये जीवनशैलीच अचूक बदल, समतोल आहाराचे सेव आणि मद्यपान,तंबाखू आदी व्यसनांपासून दूर राहणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, योगसाधना करणे जेणेकरून तणावापासूनदूर राहणे शक्य होईल.

# डोळ्यात कचरा गेल्यावर करा 'हे' उपाय



डोळ्यात कचरा गेल्यावर करा हे उपाय डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदुषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहचू शकते. वातावरणातील धुलीकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

- सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.
- डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असतांना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरु नये.
- अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.
- डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.
- डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल. तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

# जीवनशैली बदलल्यास कॅन्सरवर मात करणे शक्य



दिवसेंदिवस कर्करोगाचा धोका वाढला आहे. बॉलिवूड, क्रीडा क्षेत्रातील अनेक सेलिब्रेटींनाही कर्करोगाने ग्रासलं होतं. त्यापैकी काही जणांनी कॅन्सरशी यशस्वी झुंज दिली तर काहींना मात्र प्राण गमवावे लागले. कर्करोग हे भारतातील मृत्यूंसाठी कारणीभूत असणारा एक प्रमुख घटक आहे. त्यामुळे तंबाखू वर्ज्य करण्याचा, व्यायाम करण्याचा, सकस आहार घेण्याचा आणि कर्करोगाची नियमित चाचणी करून घेण्याचा, कुटुंबाची कर्करोगाची पार्श्वभूमी लक्षात घेण्याचा आणि वेळेवर लस घेण्याचा सल्ला एसीआय कंम्बाला हिल हॉस्पिटलच्या हेड अँड नेक कॅन्सर विभागाचे प्रमुख डॉ. दीपक पारीख यांनी दिला आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर), इंडिया अगेन्स्ट कॅन्सर आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर प्रिव्हेन्शन अँड रिसर्च या संस्थांनी दिलेल्या आकडेवारीनुसार दर वर्षी कर्करोगाचे ११,५७,२९४ रुग्ण नोंदविले जातात सुमारे २२.५ लाख रुग्ण या आजारासह जगत आहेत. त्याचप्रमाणे २०१८ साली कर्करोगामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या ७,८४,८२१ आहे.

दिवसेंदिवस कॅन्सरच्या रुग्णांच्या संख्येत वाढच होत आहे. या वाढीला प्रामुख्याने पर्यावरणीय घटक कारणीभूत आहेत. धूम्रपान करणं घातक आहेच, मात्र पॅसिव्ह स्मोकिंगही (इतरांच्या धूम्रपानाचा धूर श्वासावाटे आपल्या शरीरात येणे) जीवघेणं ठरू शकतं. या दोन्ही प्रकारच्या धूम्रपानाचे दुष्परिणाम लगेच नव्हे तर, २० ते २५ वर्षांनंतर जाणवू लागतात. म्हणजेच, कॅन्सरच्या आता वाढलेल्या प्रमाणास १९९० मधील धूम्रपान कारणीभूत असू शकेल, हे लक्षात घ्यायला हवं. महिलांनी साधारण चाळीशीनंतर दरवर्षी मॅमोग्राफी व पॅप्स स्मीअर या चाचण्या करणं गरजेचं आहे. यामुळे अनुक्रमे ब्रेस्ट व सर्व्हायकल कॅन्सरचा संभाव्य धोका लक्षात येऊ शकतो. या प्रकारच्या कॅन्सरचं योग्यवेळी निदान झालं, तर कॅन्सरला रोखता येतं. आहाराचा विचार केला तर मांसाहारी व्यक्तींनी प्रोसेस्ड मीट बिलकूल खाऊ नये. अशा प्रकारचं मटण हे कॅन्सरला प्रोत्साहन देणारं ठरू शकतं. जीवनशैलीमध्ये आवश्यक बदल केल्यास कॅन्सरचा धोका नियंत्रणात ठेवता येतो.

### कर्करोगाला दूर ठेवा

- **तंबाखू :** तंबाखू किंवा धूम्रपानामुळे फुफ्फुसांचा कर्करोग होतो. हा संबंध १९५० मध्येच प्रस्थापित करण्यात आला आहे. आता धूम्रपान करणाऱ्यांमध्ये न करणाऱ्यांच्या दहापटीने कर्करोग होण्याचे प्रमाण वाढते. जे सिगारेटच्या प्रतिदिनी ओढल्या जाणाऱ्या दरावर अधिकच अवलंबून असते. सिगारेट ओढण्याने घशाचा कर्करोग (आठ पटीत), तोंडाचा व श्वासनलिकेच्या आरंभाचा कर्करोग (चार पटीत) तर मूत्राशय व पॅन्क्रियाजचा कर्करोग दोन पटीने होतो. पाईप (चिलीम) किंवा सिगार ओढणाऱ्यांना तर अधिकच धोका संभवतो. जे सिगारेट ओढत नाहीत, पण सिगारेट ओढणाऱ्याच्या संपर्कात राहतात, अशांना धूर नाकारत गेल्याने कर्करोग होऊ शकतो. सिगारेटमधील टारमुळे ३०% प्रमाणात कर्करोग होतो.
- **मद्यपान :** अतिप्रमाणात मद्यपानामुळे यकृताचा कर्करोग तर होतोच, पण तोंडाचा, घशाचा (अन्ननलिकेचा) ही कर्करोग होतो. दारू पिणारे बहुतांशी प्रमाणात सिगारेट किंवा तंबाखूचे शौकीन असतात, हे अधिक घातक ठरते. मद्यपान व धूम्रपान हे एकमेकांना पूरक असल्याने असे पदार्थ टाळण्यानेच कर्करोगाला आळा घालणे शक्य आहे.
- **मसालेदार अतिशय गरम पदार्थांचे सेवन :** आपल्याला माहित आहे का.. मसालेदार, अतिशय गरम पदार्थांचे सेवनताने मच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. मसालेदार व गरम पदार्थांचे अति णात सेवन केल्याने फुफ्फुसे, तोंड, अन्ननलिकेचा कर्करोग होऊ शकतो.
- **एचपीव्ही विषाणू :** एचपीव्ही विषाणूमुळे गर्भाशयाचा कर्करोग होतो, ही बाब आतापर्यंत सर्वांना ज्ञात होती. आता हे विषाणू घशाच्या कर्करोगासही जबाबदार असतात, हेही अनेक संशोधनांमधून सिद्ध झाले आहे. 'एचपीव्ही-१६' हा त्यातील सहसा आढळणारा विषाणू आहे. तो पुरुष व स्त्रिया या दोघांवरही परिणाम करतो. ज्या व्यक्ती अनेक जणांशी मुखमैथुन करतात, त्यांना 'ओरोफारिंजिअस' कर्करोग होण्याचा धोका खूपच जास्त असतो. मुखमैथुनातून 'एचपीव्ही'चे इन्फेक्शन झाले, तर घशाचा कर्करोग होतो.
- **स्तनपान न करणे :** बाळाला स्तनपान दिल्यास मातेला गर्भाशयाचा कर्करोग होण्याची शक्यता कमी असते. मातेच्या शरीरात दूध तयार होत असताना हार्मोन्सची गरज असते. त्यामुळे शरीरात अशा कोशिका तयार होत नाहीत ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. वर्ल्ड कॅन्सर रिसर्च फाऊंडेशनच्या संशोधनानुसार एक वर्ष स्तनपान देणाऱ्या मातेला कर्करोगाचा धोका ५ टक्क्यांनी कमी होतो.
- **अतिनील किरणं :** जास्त काळ उन्हात फिरल्याने ही सुर्याची हानीकारक अतिनील किरणं त्वचेवर दुष्परिणाम करतात. त्यामुळे त्वचेचा कर्करोगाला होऊ शकतो.
- **व्यायामाचा अभाव :** व्यायाम न करणे तसेच मेदयुक्त आहार घेतल्याने रोगप्रतिकार शक्ती कमी होते आणि म्हणूनच अशा लोकांना कर्करोगाचा धोका असतो.




# शरीरावरील खाज थांबवण्यासाठी घरच्या घरी करा 'हे' उपाय

उन्हाळा सुरू झाला की उकाड्याने सगळेच हैराण होतात. घाम, चिकटपणा आणि त्यासोबत येणार वेगवेगळे आजार. त्यामुळे अनेकांना उन्हाळा नकोसा होतो. उन्हाळ्यात शरीराला घामामुळे खाज सुटते. सतत खाजवून खाजवून ती जागा लाल होते आणि चट्टे देखील उठतात. तसेच जास्त खाजवत राहिल्याने त्वचेला हानी पोहचू शकते. त्यामुळे आज आपण शरीरावरील खाज थांबवण्यासाठी घरच्या घरी काय उपाय करता येईल हे जाणून घेणार आहोत.

- **खोबरेल तेल लावा -** त्वचेच्या कोरडेपणामुळे शरीराला खाज येण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे अशावेळेस खोबरेल तेल हे उपायकारक असते. शरीराला खोबरेल तेल चोळल्यामुळे आराम मिळतो.
- **कोमट पाण्याने आंघोळ करा -** जर शरीरावर सर्वत्र खाज येत असेल तर कोमट पाण्याने आंघोळ करा आणि त्यानंतर शरीराला खोबरेल तेल लावा.
- **खाज थांबवण्यासाठी हे मिश्रण करा -** मीठ, हळद आणि मेथी यांचे मिश्रण करा आणि हे मिश्रण आंघोळ करण्यापूर्वी पाच मिनिटे लावा. त्यानंतर आंघोळी करा यामुळे शरीरावरील खाज थांबवण्यासाठी मदत होईल.
- **पेट्रोलियम जेली लावा -** शरीराची खाज कमी होण्यास पेट्रोलियम जेली मदत करते. तसेच त्वचा जर संवेदनशील असेल तर पेट्रोलियम जेली फारच उपयुक्त असते. त्यामुळे पेट्रोलियन जेलीचे कोणतेही दुष्परिणाम होत नसल्याने त्वचेतील सौम्यता राखण्यास मदत होते.
- **बेंकिग सोडा लावा -** सोड्यातमध्ये थोडेसे पाणी घालून पेस्ट एकत्र करा आणि ती पेस्ट फक्त खाज येणाऱ्या भागावर लावा. पण जेव्हा त्वचेवर चिर गेली असेल किंवा जखम झाली असेल तर हा उपाय करू नका. बेकिंग सोडा शरीराच्या लहानशा भागावर येणाऱ्या खाजेपासून सुटका मिळवण्यासाठी उपयुक्त असतो. जेव्हा संपूर्ण शरीरावर खाज येत असेल तर कोमट पाण्यात कपभर सोडा टाकून आंघोळ करा.
- **कोरफडातील गर लावा -** शरीरावरील खाज येत असलेल्या भागावर कोरफडातील गर लावा. काही मिनिटे तसेच राहू द्या. त्यानंतर यामुळे खाज कमी होण्यास मदत होईल.

# उन्हाळ्यात रोज अंडी खाल्ल्याने काही समस्या होते का?



उन्हाळ्यात अंडी खाल्ली जावी की नाही याबाबत अनेकांमध्ये वेगवेगळी मते बघायला मिळतात. काही लोक म्हणतात की, उन्हाळ्यात रोज अंडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल वाढतं, जे आरोग्यासाठी नुकसानकारक आहे. तसेच काहींना वाटतं की, अंडी गरम असतात त्यामुळे उन्हाळ्यात समस्या होऊ शकते. काही रिसर्चमध्ये असं सांगण्यात आलं होतं की, जास्त कोलेस्ट्रॉलचं सेवन केल्यास स्ट्रोकचा धोका वाढतो आणि त्यामुळे अंडी खाणं चांगलं नाही. पण नव्याने करण्यात आलेल्या एका रिसर्चमध्ये ही बाब नाकारली आहे.

### उन्हाळ्यात रोज अंडी खावीत की नाही?

अंड्यांमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन असतं, जे शरीरासाठी फार फायदेशीर असतं. प्रोटीन आवश्यक पोषक तत्त्व शरीराच्या वेगवेगळ्या भागात पोहोचवण्यास मदत करतं आणि सेल्सचं कामही योग्यप्रकारे होण्यास मदत करतं. पण अनेकदा हा प्रश्न उपस्थित केला जातो की, खरंच अंड आरोग्यासाठी फायदेशीर आहे? खासकरून तेव्हा जेव्हा त्यात कोलेस्ट्रॉलचं प्रमाण अधिक जास्त असतं. कोलेस्ट्रॉलचं जास्त प्रमाण हृदयासाठी चांगलं मानलं जातं नाही. काही असेही रिसर्च आहेत की, ज्यात सांगण्यात आलंय की, जास्त कोलेस्ट्रॉलचं सेवन केल्याने स्ट्रोकचा धोका वाढतो. पण नव्या रिसर्चमध्ये याउलट सांगण्यात आलं आहे. त्यात दावा करण्यात आला आहे की, अंडी खाल्ल्याने स्ट्रोकचा धोका नसतो.

### काय सांगतो रिसर्च?

यूनिव्हर्सिटी ऑफ इस्टर्न फिनलॅंडच्या एका स्टडीनुसार, रोज एक अंड खाल्ल्याने स्ट्रोकचा धोका वाढत नाही. जर अंड्यांचं सेवन नियमितपणे सामान्य प्रमाणात केलं तर हृदयाला कोणताही धोका नसतो. हा रिसर्च अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित करण्यात आला. यासाठी अभ्यासकांनी १९८४ ते १९८९ दरम्यान ४२ ते ६० वयोगटातील १९५० अशा पुरूषांवर अभ्यास केला ज्यांना कोणत्याही प्रकारची हृदयासंबंधी समस्या नव्हती. यातील केवळ १,०१५ पुरुषांचाच संबंधित अढडए फीनोटाइप डेटा उपलब्ध होता. या रिसर्चनुसार, या लोकांचं २१ वर्षांपर्यंत परिक्षण करण्यात आलं. परिक्षणादरम्यान साधारण २१७ स्ट्रोकच्या केसेस समोर आल्या. अभ्यासकांनुसार, यातील एकही स्ट्रोक ना डायटरी कोलेस्ट्रॉलमुळे होता ना अंड्यांचं सेवन केल्याने होता.

### आणखीही काही मुद्दे

दरम्यान या रिसर्चबाबत आणखी अभ्यास करण्याची गरज आहे. कारण या रिसर्चमध्ये लोकसंख्येच्या एका छोट्या भागावरच अभ्यास करण्यात आला. त्यासोबतच जे लोक रिसर्चमध्ये सहभागी होते, त्यांना रिसर्चदरम्यान कोणत्याही प्रकाकची हृदयासंबंधी समस्या नव्हती.

# उन्हाळी लागल्यास करा 'हे' घरगुती उपाय



उन्हाळ्यात उन्हाळी लागण्याचे प्रकार अनेक वेळा घडतात. उन्हाळी म्हणजेच सतत लघवीला होणे किंवा लघवी करताना जळजळ होणे. अशावेळी लघवी गढूळ होते किंवा रक्तामुळे ती लालसर तपकिरी असते. उन्हाळ्यात शरीरातील घामामुळे पाण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे लघवीत क्षारचे प्रमाण वाढते. म्हणून शरीरात पाणी नसल्याचे उन्हाळी लागते. त्यामुळे आज आपण उन्हाळी लागल्यावर घरगुती उपाय काय करता येईल हे जाणून घेणार आहोत.

- उन्हाळी लागल्यावर भरपूर प्रमाणात पाणी प्या.
- कलिंगडचा रस प्यायल्याने देखील उन्हाळीची समस्या दूर होते.
- तसंच धने, जिरे, बडीशेप भिजवून, कुस्करून ते पाण्यात मिसळा आणि त्यात खडीसाखर घालू प्या.
- आमसुलाचे पाणी आणि कोकम सरबत साखर घालून प्यावे.
- पुदिन्याचे पाणी प्यायलाने देखील फायदा होतो.
- खाण्याचा सोडा आणि लिंबू पाण्यात मिसळून प्यायल्यास त्रास कमी होतो.
- तसंच नारळाच्या पाण्यात धने आणि गूळ घालून प्यायल्याने उन्हाळीची समस्या दूर होते.
- कैरीचे पन्हे वेलदोड घालून प्या. यामुळे देखील उन्हाळीचा त्रास कमी होतो.
- शहाळ्याचे पाणी आणि नीरा प्यायलाने देखील फायदा होतो.

# राज्याचे कॉम्प्रेस्ड 'बॉयोगॅस' धोरण जाहीर

## अंमलबजावणीसाठी ५०० कोटींची तरतूद... राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

कचरा साठल्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या आणि पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, २०२६ राबवण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी २०२६-२७ या वर्षात ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यामुळे शहरांतील कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणे शक्य होणार आहे. कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस धोरणाच्या अंतर्गत कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. असे प्रकल्प पीपीपी व हायब्रिड अँन्युएटी तत्त्वावर



राबवण्यात येतील. हे धोरण कचऱ्याचे ऊर्जा व खतामध्ये रूपांतर करून रोजगार व संपत्ती निर्माण करणारे आहे.

**सार्वजनिक आरोग्यासाठी हितकारी**

नागरी भागातील कचऱ्याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया आणि स्वच्छ ऊर्जेत रूपांतर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाद्वारे कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या उत्पादनाला आणि घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेवरील भार कमी होईल. सार्वजनिक आरोग्यात सुधारणा व हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी झाल्याने वातावरणाची गुणवत्ता वाढेल. जमिनीचा ऱ्हास, वायू प्रदूषण, नागरी कचरा आणि कृषी कचरा स्त्रोतांवर कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन देणे, धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

**सार्वजनिक-खासगी भागीदारी, हायब्रिड अँन्युटी मॉडेल**

राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव तर जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील. या समित्यांमार्फत प्रकल्पांची निवड, समन्वय, अंमलबजावणी आणि संनियंत्रण केले जाईल. प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण २०२६ आणि हायब्रीड अँन्युटी मॉडेलनुसार राबवण्यात येणार आहे.

**प्रकल्पासाठी २०० टन प्रतिदिन क्षमेतचा निकष**

कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस प्रकल्पांसाठी किमान २०० टन प्रतिदिन क्षमतेचा निकष ठेवण्यात आला आहे. हे प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि उपक्रम, खासगी विकासक आणि तेल व वायू वितरण कंपन्यांमार्फत ग्रीनफिल्ड किंवा ब्राऊनफिल्ड स्वरूपात राबवता येतील. ज्या ठिकाणी पुरेसा कचरा उपलब्ध नाही तिथे क्लस्टर-आधारित प्रकल्प तसेच कृषी उत्पादक संस्थांच्या मदतीने कृषीतील टाकाऊ घटकांचे एकत्रीकरण करून प्रकल्प उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे.

# वसई तहसील कार्यालयातील भ्रष्टाचार उघड




**अपर तहसीलदार फरार**

या प्रकरणात मुख्य आरोपी असलेले अपर तहसीलदार विनोद बाळकृष्ण धोत्रे यांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. मात्र, कारवाईची चाहूल लागताच ते फरार झाले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुहास नदाफ आणि भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली पोळ व त्यांच्या पथकाने केली आहे.

**■विरार। प्रतिनिधी,**

वसईतील तहसीलदार कार्यालयात सुरू असलेल्या कथित भ्रष्टाचारावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी मोठी कारवाई करत धाड टाकली. अनधिकृत बांधकामावर कारवाई टाळण्यासाठी ७ लाख रुपयांची लाच स्वीकारताना एका खासगी इसमाला रंगेहाथ अटक करण्यात आली, तर या प्रकरणातील मुख्य संशयित अपर तहसीलदार फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या वसई पूर्वेकडील देपिवली येथील जागेवरील अनधिकृत बांधकाम पाडू नये तसेच जागेचे अकृषिक (एन.ए.) रूपांतर करून देण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी करण्यात आली होती. सुरुवातीला तब्बल ४० लाखांची मागणी करण्यात आली होती. त्याशिवाय बांधकामावरील कारवाई थांबवण्यासाठी १० लाखांची स्वतंत्र मागणी होती. चर्चेनंतर अखेर ७ लाखांवर व्यवहार निश्चित करण्यात आला.

या मागणीविरोधात तक्रारदाराने ठाणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यानुसार पथकाने सापळा रचून अपर तहसीलदार कार्यालयाशी संबंधित खासगी इसम अनिल प्रभाकर चौबल याला ७ लाखांची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

# एकीकडे उकाड्याच्या झळा... दुसरीकडे तासन्तास वीज गायब

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहरात वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर विजेचा सतत खंडित होणारा पुरवठा नागरिकांसाठी मोठे संकट बनला आहे. दिवसातून अनेक वेळा तासन्तास वीज गायब होत असल्याने रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे.

वसई-विरार परिसरात सध्या तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचले असून उष्णतेचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत वीजपुरवठा नियमित राहणे अत्यावश्यक असताना वारंवार जाणाऱ्या वीजेमुळे नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अनेक भागांमध्ये दिवसातून तीन ते चार तास वीज गायब होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.



महावितरणकडून दुरुस्तीच्या कामांचे कारण दिले जात असले तरी नागरिकांच्या मते ही समस्या आता अपवाद राहिलेली नाही, तर रोजचीच बाब बनलेली आहे. विशेषतः शुक्रवारी काही भागांमध्ये पाच ते सहा तास वीज नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट होते. यामुळे घरातील पंखे, कुलर, फ्रिज यांसारखी उपकरणे बंद पडतात आणि उकाड्याने नागरिक अक्षरशः हैराण होतात.

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे लहान मुले दिवसभर घरात असतात. मात्र वीज नसल्यामुळे त्यांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागतो. तसेच वृद्ध नागरिक, आजारी रुग्ण आणि लहान बालकांसाठी ही परिस्थिती अधिकच धोकादायक ठरत आहे.

रात्रीच्या वेळीही वीज खंडित होत असल्याने नागरिकांची झोप उडत असून थकवा आणि चिडचिड वाढत आहे. व्यावसायिकांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. लहान दुकानदार, वर्कशॉप आणि घरगुती उद्योगांमध्ये कामकाज थांबते, त्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे. थंड पेय, आईस्क्रीम, दुग्धजन्य पदार्थ विकणाऱ्या दुकानदारांचे विशेष नुकसान होत असल्याचेही समोर आले आहे.

तसेच वीज खंडित करण्यापूर्वी कोणतीही पूर्व सूचना दिली जात नाही. अचानक वीज गेल्याने ऑनलाइन कामे, शाळांचे उपक्रम आणि घरगुती कामांमध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे नियोजन शून्य कारभाराबद्दल नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# वाहतूककोंडीवर उपाययोजना सुरू... वसई-विरारसाठी सर्वकष गतिशीलता आराखडा तयार होणार

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई विरार शहरातील वाढत्या वाहतूककोंडीला आळा घालण्यासाठी महापालिकेने ठोस पावले उचलली आहेत. शहरातील वाहतुकीचे नियोजन सुधारण्यासाठी 'सर्वकष गतिशीलता आराखडा' तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामुळे वाहतुकीच्या समस्यांना दीर्घकालीन दिलासा मिळण्याची शक्यता आहे.






वसई-विरार महापालिका क्षेत्रात दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. प्रमुख रस्ते, आणि स्थानक परिसरात नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने वाहतुकीचे नियोजन अधिक प्रभावी करण्यासाठी 'कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन' तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेसाठी विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. शहरातील वाहतुकीचा सखोल अभ्यास करून पुढील काही वर्षांसाठी ठोस नियोजन केले जाणार आहे. यामध्ये सध्याच्या अडचणींसोबतच भविष्यातील गरजांचाही विचार केला जाणार आहे. या आराखड्यांतर्गत दोन स्तरांवर काम करण्यात येणार आहे. तातडीच्या समस्या सोडवण्यासाठी 'शॉर्ट टर्म' उपाययोजना राबवण्यात येतील तर मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश 'लाँग टर्म'योजनेत केला जाणार आहे.

शहरात रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यासोबतच बस, रिक्षा आणि रेल्वे यांसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा समन्वय साधण्यावर या मोबिलिटी प्लॅन मध्ये विशेष भर दिला जाणार आहे. या एकत्रित नियोजनामुळे प्रवास अधिक सुकर होऊन वेळ आणि इंधनाची बचत होईल तसेच भविष्यात वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**वसई-विरार मधील प्रस्तावित महत्त्वाचे प्रकल्प**

**प्रमुख रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण (72 किमी)**

ल मुख्य रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी मोठा निधी मंजूर करण्यात आला असून रस्ते अधिक टिकाऊ व सुरक्षित बनवण्यावर भर दिला जाणार आहे.

**नवीन उड्डाणपूल उभारणी**

नायगाव-जुचंद्र, विरार-नारंगीसह इतर गर्दीच्या चौकांवर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे सिग्नल वरील गर्दी कमी होऊन वाहतूक सुरळीत होईल.

**रेल्वे उड्डाणपूल प्रकल्प**

विराट नगर आणि ओसवाल नगरी येथे रेल्वे फाटकांमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी उड्डाणपूल उभारले जाणार आहेत. यामुळे प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित होईल.

**विरार सॅटिस प्रकल्प**

विरार रेल्वे स्थानक परिसरात होणारी प्रचंड गर्दी आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सॅटिस प्रकल्प राबवला जाणार आहे. या प्रकल्पामुळे पादचारी आणि वाहन वाहतुकीचे नियोजन अधिक सुटसुटीत होईल.

**रिंग रोड प्रकल्प (38 किमी)**

शहरातील वाहतूक वेगवान आणि पयार्यी मार्ग उपलब्ध व्हावेत यासाठी सुमारे 38 किलोमीटर लांबीचा रिंग रोड उभारण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पामुळे विविध भागातील वाहतूक शहरात न शिरता बाहेरून वळवता येणार असून मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होण्याची शक्यता आहे.

# मिरा- भाईंदरमध्ये एकाच दिवशी तीन आत्महत्येच्या घटना

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा- भाईंदरमध्ये एकाच दिवशी तीन आत्महत्या झाल्याची घटना घडली आहे. पहिली घटना भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट परिसरात घडली आहे. यात एका २९ वर्षीय व्यक्तीने इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली आहे. तर दुर्सया घटनेत भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर परिसरात २१ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तर तिर्सया घटनेत मिरारोड पूर्वेच्या काशिगाव स्मशानभूमी जवळ २१ वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. यामुळे मिरा-भाईंदर शहरात आत्महत्या केल्याच्या एकाच दिवसात तीन घटना घडल्याने चिंतेचा विषय बनला आहे. या नवघर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अकस्मात मृत्यू नोंदीत जितेशकुमार परिहार (वय २९ वर्ष रा. रामेश्वर टॉवर न्यू गोल्डन नेस्ट, भाईंदर पूर्व) यांनी राहत्या इमारतीमधून कोणत्यातरी अज्ञात कारणावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. त्याला डॉक्टरांनी दाखल पूर्व मयत घोषित केले आहे. तर दुर्सया घटनेत भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर, जनता नगर रोड येथे विकासकुमार बिंद (वय २१ वर्षे) याने त्याचे आई व भाऊ कामासाठी निघून गेले असताना घरात एकटा असताना छताच्या लोखंडी आडव्या बारला साडीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली आहे. तर तिसरी घटनाही काशिगाव पोलीस ठाण्यात पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. यात दीपक शर्मा (वय २१ वर्ष राहणार दाचकुलपाडा, स्मशानभूमी जवळ काशिगाव) याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून राहत्या घरात लोखंडी अँगलला साडीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या तिन्ही घटनांप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूच्या नोंदी दाखल केल्या आहेत.

## गोरं होण्यासाठी पाकिस्तानी क्रीम वापरली अन् किडनी खराब

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 3 व्यापारी अटकेत

गोरं होण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाकिस्तानी क्रीम्समुळे थेट किडनीवर परिणाम होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरात बंदी असलेल्या या सौंदर्य प्रसाधनांची सर्रास विक्री होत असल्याचं उघड झाल्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.सिटी चौक पोलिसांनी धाड टाकत तब्बल 60 हजार रुपयांची क्रीम्स, साबण आणि सिरम जप्त केली असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

**पोलिसांची धाड :** बंदी असलेल्या पाकिस्तानी क्रीम्सची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शहागंज, घासमंडी आणि सिटी सेंटर मॉल परिसरातील दुकानांवर कारवाई केली. 'हायलाईट कलेक्शन', 'ओम ट्रेडर्स' आणि ह्यफलक इम्पोरियमह्ल या दुकानांमधून मोठ्या प्रमाणात माल जप्त करण्यात आला. एकूण 59 हजार 980 रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

**जप्त केलेली पाकिस्तानी क्रीम्स :** पोलिसांच्या या कारवाईत मल्लिका, झलक, गोरे, गोल्डन पर्ल, चांदणी, उजूबा, फेस फ्रेश, नूर हर्बल, न्यू फेस ब्युटी क्रीम यांसह विविध पाकिस्तानी क्रीम्स जप्त करण्यात आल्या. तसंच पारले गोल्ड, गोरे साबण आणि मल्लिका व्हिटॅमिन-उ सिरम यांचाही समावेश आहे.

**आरोग्यावर गंभीर परिणाम :** या क्रीम्सचा वापर करणाऱ्या काही तरुण-तरुणींनी आरोग्य बिघडल्याचा दावा केला आहे. गोरं होण्याच्या नादात वापरलेल्या या क्रीम्समुळे त्वचेवरच नाही तर थेट किडनीवरही परिणाम होत असल्याची माहिती तज्ञ डॉक्टरांनी दिली आहे.

**नागरिकांसमोर मोठा प्रश्न :** गोरं होण्याच्या हव्यासापोटी नागरिक स्वतःच्या आरोग्याशी खेळ करतायत का, असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. तज्ज्ञांच्या मते अशा क्रीम्स वापरून कायमस्वरूपी गोरे होता येत नाही, उलट त्वचा आणि किडनी दोन्ही धोक्यात येतात.

**काळाबाजार सुरूच :** सरकारची बंदी आणि पोलिसांची कारवाई असूनही अशा उत्पादनांचा काळाबाजार सुरू असल्याचं चित्र आहे. त्यामुळे प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

## झटपट गोरे होण्याचा नाद जीवावर... संभाजीनगरनंतर एफडीएची मोठी कारवाई

# नागपुरात पाकिस्तानी क्रीममुळे महिलांना किडनीचे विकार

**■नागपूर। प्रतिनिधी,**

छत्रपती संभाजीनगरनंतर आता उपराजधानी नागपूरमध्येही 'पाकिस्तानी ब्युटी क्रीम'च्या वापरामुळे अनेक महिलांना किडनीचे गंभीर आजार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावरील रील आणि जाहिरातींना बळी पडून झटपट गोरे होण्यासाठी वापरण्यात येणारी ही क्रीम आता महिलांसाठी 'स्लो पॉयझन' ठरत आहे. नागपुरातील एकाच रुग्णालयात गेल्या दोन वर्षांत तब्बल १८ महिलांना या क्रीममुळे किडनीचे आजार जडल्याचे डॉक्टरांच्या निदानातून स्पष्ट झाले आहे.

**तज्ञ डॉक्टरांच्या मते, पाकिस्तान निर्मित या क्रीम्समध्ये 'पारा' या धातूची मात्रा प्रमाणाबाहेर असते.**

जेव्हा ही क्रीम चेहऱ्यावर लावली जाते, तेव्हा त्यातील मर्क्युरी त्वचेच्या छिद्रांमधून शरीरात प्रवेश करतो. शरीरात गेलेला हा घातक घटक थेट रक्तात मिसळतो. रक्तातील हे विष फिल्टर करताना किडनीवर अतिरिक्त ताण येतो आणि कालांतराने किडनी निकामी होण्यासारखे



गंभीर विकार उद्भवतात.

**अन्न-औषध प्रशासनाची मोठी कारवाई**

नागपूर शहरात या क्रीम्सची खुलेआम विक्री सुरू असल्याची माहिती मिळताच 'एफडीए'ने (अन्न व औषध प्रशासन) शोधमोहीम राबवली. मार्केटमधून या क्रीम्सचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या कारवाईत मल्लिका, झलक, गोरे, गोल्डन पर्ल, चांदणी, उजूबा, फेस फ्रेश, नूर हर्बल, न्यू फेस ब्युटी क्रीम यांसह विविध पाकिस्तानी क्रीम्स जप्त करण्यात आल्या. तसेच पारले गोल्ड, गोरे साबण आणि मल्लिका व्हिटॅमिन-सी सिरम यांचाही समावेश आहे.

**रीलच्या नादी न लागण्याचा तज्ञांचा इशारा**

अनेक तरुण-तरुणी सोशल मीडियावरील 'इन्स्टंट फेअरनेस'चे दावे पाहून डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय या क्रीम्स वापरतात. 'चेहऱ्यावर चकाकी आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या क्रीम्स प्रत्यक्षात शरीराच्या अंतर्गत अवयवांना पोखरत आहेत. नागरिकांनी लेबल न वाचता किंवा बनावट विदेशी बनावटीची उत्पादने वापरणे टाळावे. अशा क्रीम्स वापरून कोणीही कायमस्वरूपी गोरे होऊ शकत नाही. उलट, त्यामुळे त्वचेचा कर्करोग आणि किडनी निकामी होण्याचा धोका १०० टक्के असतो,' असे मत वैद्यकीय तज्ञांनी व्यक्त केले आहे.

**नागरिकांसमोर मोठा प्रश्न**

गोरं होण्याच्या हव्यासापोटी नागरिक स्वतःच्या आरोग्याशी खेळ करताहेत का, असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. या क्रीम्सचा वापर करणाऱ्या काही तरुण-तरुणींनी आरोग्य बिघडल्याचा दावा केला आहे. गोरे होण्याच्या नादात वापरलेल्या या क्रीम्समुळे त्वचेवरच नाही तर थेट किडनीवरही परिणाम होत असल्याची माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी दिली आहे.

# अयान अहमद आईचे दागिने विकून करायचा शौक... अमरावती लैंगिक व्हिडीओ व्हायरल आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणी धक्कादायक खुलासा

**■अमरावती। प्रतिनिधी,**

अमरावतीच्या परतवाडा येथील लैंगिक शोषण, व्हिडीओ व्हायरल आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याच्याबाबत धक्कादायक खुलासे पुढे येत आहेत. अयानने आपले शौक पूर्ण करण्यासाठी स्वतःच्या आईचे मंगळसूत्र आणि सोन्याचा हार चोरून विकला होता, अशी माहिती हाती आली आहे. त्याच्या सोशल मीडिया रिल्समधे जे नोटांचे बंडल दिसायचे, ते प्रत्यक्षात आईचे दागिने विकून मिळालेले पैसे होते. अयानला महागड्या हॉटेल्समध्ये जाणे, मुलींवर पैसे खर्च करणे आणि महागडे मोबाईल वापरणे अशा विलासी सवयी होत्या, त्यासाठी त्याने आईचे दागिने चोरल्याचे आणि विकल्याचे उघड झाले आहे

अमरावतीत तरुणींचे लैंगिक शोषण प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी अयानचा भयाण चेहरा आता समोर आला आहे. पैशासाठी स्वतःच्या आईचे मंगळसूत्र आणि सोन्याचा एक हार त्याने चोरून विकला होता. अयानच्या रिल्स मध्ये असलेले नोटांचे बंडल आईचे मंगळसूत्र चोरून विकून मिळालेल्या पैशाचे होते अशी माहिती पुढे आली आहे.

**सोशल मीडियावर 'फॉलोअर्स' वाढल्याने आश्चर्य**

या प्रकरणाचा तपास आता निर्णायक टप्प्यावर आला असून, विशेष तपास पथकाच्या हाती मोठे तांत्रिक पुरावे लागले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, मुख्य आरोपी अयान अहमद याच्यावरील



गुन्ह्याचे गांभीर्य वाढत असतानाच सोशल मीडियावर त्याची 'क्रेझ' वाढताना दिसत आहे.अयान अहमद याच्या कृत्याबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत असतानाच, त्याच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्सची संख्या वाढणे चिंताजनक मानले जात आहे. गुन्हा दाखल झाला तेव्हा अयानचे १८ हजार फॉलोअर्स होते, मात्र अटकेनंतर अवघ्या काही दिवसांत त्यात ४ हजारांची भर पडून हा आकडा २२ हजारांच्या पार गेला आहे. समाजविघातक कृत्य करणाऱ्या आरोपीची ही 'क्रेझ' वाढल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

**तांत्रिक तपासात मोठे यश**

एसआयटीने या प्रकरणात जप्त केलेल्या पाचपैकी तीन मोबाईलमधील डेटा रिकव्हर करण्यात तांत्रिक विभागाला यश आले आहे. या मोबाईलमधील चॅट्स आणि डेटावरून संशयितांच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी आणि एसआयटी प्रमुख शुभम कुमार यांच्या नेतृत्वाखाली हे पथक वेगाने कारवाई करत असून, लवकरच काही मोठ्या अटकेची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**आतापर्यंत १० संशयितांना अटक**

अयान अहमद आणि त्याचा मित्र उजैर खान यांनी केवळ शोषण केले की पीडित मुलींच्या कुटुंबीयांना ब्लॅकमेल करून पैशांची मागणीही केली होती? या दिशेने आता एसआयटीने तपासाची चक्रे फिरवली आहेत. आतापर्यंत १० संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणावर स्थानिक धार्मिक नेतृत्वानेही स्पष्ट भूमिका घेतली आहे. परतवाडा येथील शहर-ए-काजी सय्यद गैसोद्दीन यांनी अयान अहमदच्या कृत्याचा तीव्र निषेध केला आहे. "आरोपी कोणत्या धमार्चा आहे हे न पाहता त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. मुस्लिम समाजाने अशा गुन्हेगाराला पाठीशी न घालता त्याच्या शिक्षेसाठी पाठिंबा द्यावा," असे आवाहन त्यांनी केले आहे.

**मोबाईल, लॅपटॉप, टॅब, हार्डडिक्स प्रयोगशाळेत**

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी पत्रकार परिषद या प्रकरणाची माहिती दिली आहे. १५ वर्षाच्या तरुणीचा आम्ही ऑन रेकॉर्ड जबाब घेतला आहे. यावेळी तरुणीची आई सोबत होती. आठ पीडितपैकी एका पीडितेने जबाब दिला आहे. ही तपासासाठी चांगली गोष्ट आहे. आरोपी क्रमांक दोन उजेर खान याच्या विरोधात एका १६ वर्षीय मुलीच्या आईने तक्रार दिली आहे. त्यामुळे एक वेगळा पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आम्ही जे मोबाईल, लॅपटॉप, टॅब आणि हार्डडिक्स हस्तगत केले ते प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहे. ज्या व्हायरल व्हिडीओमध्ये आरोपी थार गाडीत बसत आहे, त्यात बंदूक ठेवली, नोटांचे बंडल दिसत आहे. ती गाडी राजेश प्रजापती यांची आहे. तो प्रजापती कोण आहे? आणि अयान सोबत त्याचे काय संबंध आहे? याचा तपास सुरू असल्याची माहिती त्यांनी दिलीय.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com